# ॥ चैतन्य लहरी ॥

सन १९९५-९६ क्र.७ व ८



सर्व सहजयोग्यांनी आपल्या मुलांना संगीतामध्ये तज्ञ केलंच पाहिजे. संगीत हे शिकवलंच पाहिजे. ''संगीताशिवाय सहजयोग साधणार नाही.'' हे आपल्याला जाणलंच पाहिजे. हे परमेश्वराचे फार मोठे देणे आहे. तसेच हा आपल्या महाराष्ट्राचा वारसा आहे. आपल्याला मिळालेल्या एवढ्या मोठ्या देणगीला वाया घालवून उपयोगाचं नाही. संगीताशिवाय तुम्हाला सहजयोग जमायचाच नाही. तरी सगळ्यांनी आपल्या मुलांना संगीत शिकवलं पाहिजे. जरी गाता आला नाही तरी समजलं पाहिजे. एवढं झाले तरी पुष्कळ झाले.

श्री गणेश पूजा, पुणे ३०-८-८७ — श्री माताजी निर्मला देवी

# वाशी : भाषण

## मुंबई १९.२.९६

सत्याचे साधकांना नमस्कार. तुम्हा व्यावसायिक डॉक्टर मंडळींसमोर बोलणं ही एक वेगळीच गोष्ट आहे. त्यातून तुमचा हा वैद्यकीय व्यवसाय पूर्ण शास्त्रोक्त पद्धतीने चालतो असं म्हणतात. आज जगात सगळीकडे जी काही वैद्यकीय विषयांतील माहिती उपलब्ध आहे व वापरली जाते त्याला कमी लेखण्याचा किंवा नाकारण्याचा माझा आजच्या बोलण्याचा मुळीच हेतु नाही. खरं तर कोणत्याही शास्त्रीय ज्ञानाला कमी लेखण्याचा कुणालाही अधिकार नाही. प्रश्न हा आहे की कुठलंही ज्ञान पूर्ण नगत झाल्याचे वा हमखास उपयुक्त असल्याचे जोपर्यंत आल्या अनुभवास येत नाही तोपर्यंत दुसरे ज्ञान जर जास्त चांगले असेल तर त्याकडे आपण कानाडोळा करणे योग्य नाही. तुम्ही वैद्यकिय अभ्यास केला आहे आणि त्यातील प्रगत संशोधनाची पण तुम्हाला जाण आहे याचा अर्थ त्यालाच घट्ट धरून त्या विषयाबद्दल जे नवीन ज्ञान उपलब्ध आहे तिकडे बघायचंच नाही असा नाही. वैद्यकीय शास्त्राच्या मूळ नीतिबद्दल मला जे माहीत आहे त्याप्रमाणे आपण मनुष्यप्राण्याच्या कल्याणासाठी आपण हे काम करत असतो नुसता पैसाच मिळवण्यासाठी किंवा आपल्याच पद्धतीचा प्रचार करण्यासाठी नाही.

तुम्हाला माहितच आहे की शास्त्रीय नियम नेहमी बदलत असतात. अगदी सुरवातीपासून पाहिल्यास असं दिसते की प्रथम ते गृहीत गोष्टी धरून त्याचेच नियम बनलेले असतात आणि नंतर त्याचीच पडताळणी केली जाते. दुसरी गोष्ट म्हणजे सर्व शास्त्र अनीतीवर आधारित आहे. माणसांमधे नीतिमत्ता रुजवायला हवी याचा शास्त्र विचार करत नाही. तिसरं म्हणजे शास्त्रालाही मर्यादा आहेत कारण मानवी मनाच्या क्रिया-परिक्रियेतून चालत राहते. मनाने आपण जे काही समजायचा प्रयत्न करतो ते पूर्ण सत्य असू शकत नाही आणि म्हणूनच मत भिन्नता नेहमीच दिसते. जे पूर्ण सत्य आहे त्याबद्दल मतभिन्नता असूच शकत नाही. आपण सर्वांनी पूर्ण सत्य जाणण्याच्या स्थितीला आले पाहिजे जिथे सर्व डॉक्टरांचे एकच मत होईल व एकच निदान होईल.

हे सर्व लक्षांत घेऊन आपण नम्रपणाने या महान भारत देशामधे काय ज्ञान आलेले आहे हे स्वतः पाहिले पाहिजे. या सहजयोगाचे ज्ञान आपल्याकडे हजारों वर्षांपासुन चालत आलेले आहे याची आपल्याला कल्पनाच नाही मी युक्रेनमधे Kiev या ठिकाणी गेले होते तेव्हा ते लोक मच्छिंन्द्रनाथ व गोरखनाथ याच्याबद्दल बोलू शकल्याच पाहून मी आश्चर्यचकीत झाले, एवढच नाही तर त्यांच्याजवळ सर्व चक्रांची चित्रे होती आणि आदिती म्हणजे आदिमाता हे पण त्यांना ठाऊक होते. हे मोठे संत इतके पूर्वी - ख्रिस्तपूर्व ३००० वर्षे तिथे गेल्याचं व त्यांनी चमत्कारीक कार्य केल्याचं ऐकून मलाच धक्का बसला. आपल्या देशातही कुण्डलिनीबद्दल खूप माहिती आहे, पण आपण ते कधी वाचत नाही त्याची माहिती करून घेण्याची लोकांना इच्छा नाही; आयुर्वेदामधे कुण्डलिनीचा उल्लेख असल्याच पाहून मला बरं वाटले, त्याच्याबद्दल जास्त माहिती नव्हती पण उल्लेख जरूर आहे. मी ज्या या कुण्डलिनी शक्तिबद्दल बोलणार आहे ती आपल्या त्रिकोणाकृति माकड हाडामधे असते. आता मी जे काही सांगणार आहे ते तुम्ही एकदम मान्य करायची जरूरी नाही, ते एक फार वेगळं ज्ञान आहे. साडेतीन वेटोळी घालून ही शक्ति जोपर्यंत तुम्ही सत्याचा शोध घ्यायला येत नाही तोपर्यंत तिथे शांतपणे बसून असते. हे ज्ञान अनेक शतकांपासूनचे आहे. मार्कंडेय मुनी चौदा हजार वर्षांपूर्वी तिच्याबद्दल सांगत असत, आदि शंकराचार्यांनीही तिच्याबद्दल लिहिले आहे. परदेशांतही पुष्कळ संतांनी तिच्याबद्दल सांगितले, बायबलमधे उल्लेखच आहे की "मी तुमच्यासमोर अनंत अग्निज्वालांसारखी प्रकट होईल." त्यांनी जीवन-वृक्षाचे वर्णन केले; श्रीकृष्ण पण सांगतात की हा जीवन वृक्ष उलटा आहे आणि त्याची मुळे वर मेंदूमधे आहेत. त्या काळी या माहितीचा पडताळा होत नव्हता



महाराष्ट्र सेमिनार, पुणे, यामुळे अंक काढण्यास उशीर झाला, त्याबद्दल दिलगीर आहोत.

त्यादृष्टीने कुणी त्याकडे बघण्याचा प्रयत्न केला नाही पण आज माणसामधे जी ही अद्‌भुत शक्ति आहे त्याचा आज प्रत्यय येऊ शकतो. ती ज्या हाडामधे आहे त्याला सेक्रम - बोन म्हणतात. मी काही ग्रीक लोकांना त्याबद्दल विचारलं तर ती पवित्र शक्ती असल्याने तिचा वास या पवित्र हाडामधे आहे असंच ते म्हणाले. त्यांना हे भारतांतून खुप वर्षांपूर्वी त्यांच्याकडे आलेल्या लोकांनीच हे सांगितल्याचे ते पुढे म्हणाले. ही कुण्डलिनी शक्ती एकाद्या बीजाला फुटणाऱ्या अंकुरासारखी आहे, जमिनीमधे बी पेरल्यावर त्याला आपल्याआपण सहज अंकूर फुटतो, त्यासाठी आपल्याला काही करावं लागत नाही. तुम्ही या भूमातेला त्यांची किंमतही देऊ शकत नाही. डोक्यावर उलटे उभे राहण्याची किंवा इतर विचित्र कष्ट करण्याची जरूर नाही अंकुर फुटण्याची ही शक्ति त्या बीजामध्येच सामावून आहे आणि तीच अंतर्भूत शक्ति मातीमधे पण आहे हा अंकुर फुटून आणि एक जिवंत क्रिया सुरु झाल्याचे तुम्ही बघता.

उत्क्रांतीच्या परिक्रियेमधून आपण मानव स्थितीला आलो आणि मानवाचा जन्म मिळाला, आपल्या आतमधे काय काय व्यवस्था आहे याची आपल्याला काहीच माहिती नाही, वाह्यजगाबद्दल आपल्याकडे सर्व ज्ञान आहे पण हे मुळातील ज्ञान आपल्याला माहित नाही कारण आपण तसा प्रयत्न करत नाही की पुरातन ग्रंथामधे जे काही त्याबद्दल लिहून ठेवले आहे ते पण माहित करून घेण्याचा प्रयत्न आपण करत नाही. आपल्या देशांत पुरातन काळापासुन अनेक साधुसंतांनी व अवतारी पुरुषांनी हे जे काही लिहून ठेवले आहे त्यामागे नक्कीच एक उद्देश असला पाहिजे हे आपण लक्षात घ्या. आता या शक्तिमधे काही गूढ असं नाही. उन्नतीच्या मार्गातील शेवटचा टप्पा पार करण्यासाठी या शक्तीचे आतां प्रकटीकरण झाले आहे. मानवी जाणीवेनंतर आता आपल्याला पुढच्या मोठ्या जाणीवेच्या टप्प्यावर यायचे आहे जिथे आपल्या स्वरूपाची पूर्ण ओळख होणार आहे. जपानमधील झेन (Zen) पद्धतीमधे चीनमधे लीओ त्सेने हेच सांगितले आहे की प्रत्येकाने या नवीन जाणीवेच्या अनुभवासाठी मनाच्या पलीकडे गेले पाहिजे.

आता मी या 'मन' संबंधी सांगते मन हे काल्पनिक आहे जे आपल्या अहंकारामुळे व संस्कारामुळे निर्माण झाले, त्याला सत्यता नाही, या मनांतुनच अहंकार व संस्कार निर्माण झाले आणि त्यांनीच नंतर मनाचा ताबा घेतला. जसं आपण कॉम्प्युटर बनवला आणि तोच हुकूमत गाजवायला लागला. आपलं मन तसंच आहे. खरं तर मन म्हणजे अहंकार आणि संस्कार यांच्याकडून बुडबुड्यासारखे आलेले विचार प्रवाह आहे. या मनाला जिंकणे सोपे नाही, सर्व शास्त्रे सांगतात की ते फार कठीण काम आहे. मनाच्या पलीकडे जाणं शक्य नाही असं म्हणतात. आता मन जे काही आहे तिकडे पहा. आपण सतत भूतकाळचा नाही तर भविष्यकाळाचा विचार करत असतो; वर्तमानकाळाकडे या क्षणी काय चालले आहे तिकडे लक्षच देत नाही मग मनाकडून आपल्या डोक्यात विचारांचे बुडबुडे येऊ लागतात; एक विचार संपतोतर दुसरा मग तिसरा आणि विचारांच्या या लाटांवर आपण नाचत राहतो. सत्य हे वर्तमानांतच असते. जीवनाची सत्यता हे वर्तमानच आहे पण तरीही आपण वर्तमान काळ लक्षांत घेत नाही. हे सर्व प्रस्थापित व्हायला हवे आणि त्यासाठी ही कुण्डलिनी आपल्यामधे आहे. ती तुमची स्वतःची आईच आहे असं मी म्हणते आतां वैद्यकीय शास्त्र आई-वडिल या कल्पना ठेवत नाही पण आपण काही झाडावर टांगलेले जीव नसल्यामुळे आईवडिल जाणतो. ही कुण्डलिनी सहा चक्रांमधून वर येते. आणखी एक चक्र माकड हाडाच्या खाली आहे. सहजयोग पद्धतीमध्ये ही सहा चक्रे तुमचे शारिरीक, मानसिक, भावनिक व अध्यात्मिक जीवन संभाळतात. वर येताना ही कुण्डलिनी साही चक्रांचे पोषण करते आणि सर्वव्यापी ईश्वरी शक्तीबरोबर तुमचे संधान जोडते. आजपर्यंत चर्चमधे किंवा इतर धार्मिक उपासनांमधे परमेश्वरी शक्ती आपली काळजी घेत असल्याचे बोलले जात होते, परम चैतन्याबद्दल ऐकू यायचे पण वैद्यक शास्त्राशिवाय इतर कोणी त्याचा विचार केला नाही. आपल्या सभोवार पसरलेले हे परम चैतन्य सर्व जिवंत क्रिया करत असते. या फुलांकडे पहा, किती मनोहर आहेत, आणि ही वेगवेगळ्या रंगाची, वासाची, आकाराची फुले या मातीतूनच आली हा चमत्कारच नव्हे कां ? हे सारे कोण करते ? आपल्याला व्यापून असणारी महान शक्तीच ते सारं करते. पातंजलीने तिला ऋतंभरा प्रज्ञा म्हटले आहे जी सगळे ऋतू निर्माण करते. पण ही प्रज्ञा, आपल्या सभोवार पसरलेले हे प्रकाशमय ज्ञान आपण ओळखू शकलो नाही आणि ही शक्ति खरोखरच आहे किंवा काय हे आपल्याला कळले नाही, कारण मनच आपल्या सत्य जाणण्याच्या आड येत होते आहे. झेन (Zen) पद्धतीत स्वच्छ सांगितले आहे की तुम्ही मनाच्या पलीकडे जायला हवे जिथे निर्विचारता आहे. यालाच निर्विचार समाधी म्हणतात. त्या स्थितीमधे तुम्ही निर्विचारी पण जागृत असता शिवाय या परमेश्वरी शक्तीशी एकरुप होता. एक भारतीय म्हणून हे जाणण्याचा तुम्हाला हक्क आहे आणि त्याचा उपयोग मानवतेच्या उद्धारासाठी आहे हे जाणण्याची ही स्वतंत्रता आहे हा नुसता अध्यात्मिक उद्धाराचा किंवा आत्मसाक्षात्कार मिळवण्याचा प्रश्न नाही तर तुम्ही शारीरिक, मानसिक व भावनिक संपन्नता मिळवून तुमच्या व्यक्तिमत्त्वामधे अमूलाग्र परिवर्तन होते.

डॉ. राय साहेबांनी आत्ताच आपल्यात काय दोष आहेत हे सांगितले पण सगळ्यांत मोठा दोष म्हणजे भ्रष्टाचार. पण अगदी भ्रष्ट माणूसही प्रामाणिक बनतो; त्याच्यामधे संतत्व प्रकाशित झाल्यामुळे तो भ्रष्ट होऊच शकत नाही हे लोकांचा

विश्वास बसणार नाही इतकं चमत्कारिक वाटते. कारण आपणच इतके चमत्कारिक व महान आहोत की आपल्याच हाताशी असलेल्या या वैभवाची आपल्याला जाण नाही. कुण्डलिनी जागरणांतून ते प्रकट होणारे आहे आणि इतर गोष्टी या आपोआप बाय - प्रॉडक्टप्रमाणे मिळतात. आतां कॅन्सरही सहजयोगाने हमखास बरा होते. यांत काहीही शंका यायचे कारण नाही. अर्थात फक्त हाच रोग बरा होतो अशा तऱ्हेचे स्पेशलायझेशन सहजयोगांत नाही. लोक आजकाल म्हणतात एका डोळ्यासाठी एक डॉक्टर दुसऱ्यासाठी दुसरा अशी तऱ्हा नाही. हे कार्य एकसूत्रीपणाने चालते कारण कुण्डलिनी जेव्हा वर येते तेव्हा एखाद्या दोऱ्यासारखी या सर्व चक्रांमधून ती वर येते आणि तुमचा परमेश्वरी शक्तीबरोबर संपर्क घडवते आणि त्यातूनच साही चक्रे ठीक होतात. आता कॅन्सरचे पाहू. मी काही कोणी शास्त्रज्ञ नसल्यामुळे तसल्या तऱ्हेने मी काही सांगणार नाही. पण ते अगदी सोपे आहे. आता कॅन्सरबद्दल घाबरून जाण्याचे कारण नाही कारण तो एक मामुली आजार आहे. आपल्यामधे सिंपथेटिक आणि पॅरासिंपेथेटीक अशा दोन नाडी संस्था आहेत, डाव्या बाजूची डावी सिंपथेटिक व उजव्या बाजूची उजवी सिंपथेटिक. वैद्यकशास्त्रामधे हा फरक आहे का नाही मला ठाऊक नाही पण मी जेव्हा डॉक्टरी शिकत होते तेव्हा फरक त्यांना माहीत असल्याचे मला दिसले नाही, त्या दोन्ही एकच आहेत असे मानले जायचे. पण तसं नाही, या दोन नाड्या परस्परांना पूरक असल्या तरी त्यांचे कार्य एकमेकांच्या विरुद्ध आहे. डावी बाजू तुमचे भावनिक कार्य आणि भूतकाळाशी निगडीत आहे तर उजवी बाजू भविष्यकाळ आणि तुमचे प्रत्यक्ष कार्य (शारीरिकही) व त्याच्याबरोबर चालणारे बौद्धिक कार्य ज्याला चुकीने मानसिक म्हणतात संभाळते. इंग्रजीत (Mental) या शब्दाला काहीही म्हणतात. अगदी भावनांना सुद्धा पण इथे विचारांतून चाललेलं कार्य संबंधित आहे. या दोन नाड्या लंबाकार वेटोळ्यासारख्या असतात. आता कॅन्सरचे कारण म्हणजे तुमची एक बाजू - उजवी जास्त वापरली जाते. जसे काही लोक सतत भविष्याबद्दलच्या योजना आखण्यांत सारखे घड्याळाकडे बघणारे असतात. आजकालचा मानव असाच झाला आहे. उजव्या बाजूचा अती वापर झाल्याने या (स्वाधिष्ठान) चक्रावर ताण येतो आणि ते आकसल्याने त्यांच्यातील शक्ती कमी होते. त्याचबरोबर अशा व्यक्तिला काही भावनिक प्रश्न आला किंवा धक्का बसण्यासारखी काही घटना झाली तर हे चक्र बंद पडते. ते बंद झाल्यावर तुमचा मेंदूबरोबरचा संपर्क पूर्णपणे तुटतो आणि शक्ति अशा तऱ्हेने वाहते की सर्व पेशी स्वतंत्र होतात व त्यांचा आतील व्यवस्थेबरोबरचा संबंध संपतो. आता डावी बाजू डॉक्टरसाहेबांनी सांगितलेच की मी फार पूर्वीच सांगितले आहे की ती भूतकाळाशी निगडीत आहे. मी त्यांना असंही सांगितले होते की त्या डाव्या बाजूने येणाऱ्या अटॅकला, ज्याच्यामुळे कॅन्सर होतो, ५३ असं विशेष नांव दिले आहे. त्याचं असं आहे की डाव्या बाजूकडून जी प्रथिने (Proteins) आपल्या शरीरात येतात ती इतर सर्व पेशींवर हकुमत करतात आणि त्या पेशी नादुरुस्त निकामी होऊन स्वतंत्र होतात. या दोन गोष्टी एकत्रित आणून हे चक्र पुन्हा व्यवस्थित करणे अगदी सोपे आहे आणि ते जर तुम्ही करू शकलात तर प्रश्नच सुटेल.

दुसरी एक साधी गोष्ट तुम्हाला सांगावीशी वाटते. कारण ती तुमच्यासारख्या सारखं काम करणाऱ्या सतत विचार करणाऱ्या भविष्यकाळाच्या योजना आखण्यांत गर्क असलेल्या लोकांना फार महत्त्वाची आहे. मिनिस्टर आणि तुमच्यासारखा भविष्यकाळाबद्दल काळजी करणाऱ्या लोकांना पुढे काय होणार आहे? स्वाधिष्ठान असं हे चक्र आहे ते मागच्या बाजूला का आहे मला माहित नाही पण नंतर तुम्हाला ते समजेल, हे चक्र नाभीचक्रापासुन आले आहे. तुम्हां लोकांच्या दृष्टीने हे चक्र फार महत्त्वाचे आहे. वैद्यकशास्त्रामधे त्याबद्दल मानले जाणार नाही पण ते सिद्ध करून दाखवलं जाईल, कारण मेंदूला विचार करण्यासाठी लागणारी शक्ति हे चक्रच पुरवते. आपण विचार करत राहतो पण त्यासाठी लागणारी शक्ती कुठून येते हे आपण लक्षात घेत नाही. या चक्रामधून मेंदूतील राखी रंगाच्या पेशींना शक्ति मिळते; त्याचं आणखी कार्य म्हणजे ते तुमचे स्वादुपिंड, प्लीहा, किडनी व आतडी या सर्वांचे कार्य संभाळते. जे लोक सतत विचार करत असतात, भविष्याच्या योजना आखत असतात. टेबलावर बसूनच दिवसभर काम करत असतात. हे कर ते कर असा उद्योग करत असतात ते या चक्राची सर्व शक्ती अशा नंतरच्या कार्याकरतां खर्च करतात. त्यामुळे या चक्राला त्याच्या दुसऱ्या कार्यामध्यें अडथळे येऊन दुर्लक्ष होते आणि या सर्वांचा प्रथम परिणाम लीव्हरवर होतो. डॉक्टर साहेबांनी सांगितलेच आहे आणि मी पण तेच सांगते की लीव्हरची कुणीच पर्वा करत नाही, आणि मला सांगायला वाईट वाटते की डॉक्टर लोकांना पण लीव्हरची फारशी माहिती नसते. या लीव्हरमुळेच आपण जिवंत असतो. लीव्हरकडे दुर्लक्ष झाले की त्यामधे एक प्रकारची उष्णता येते - त्याला वैद्यकभाषेतील संज्ञा मी सांगणार नाही - पण ही उष्णता फार अपायकारक असते. लीव्हर शरीरातील सारी उष्णता खेचून घेत असते व ती रक्तामधे पाठवून शरीरातुन नाहीशी करते, पण लीव्हरकडे दुर्लक्ष झाले की ते हे काम करु शकत नाही, परिणामस्वरुप त्याच्यात दोष निर्माण होतो आणि त्यामुळे ही उष्णता वरच्या व खालच्या बाजूला पसरत जाते. वरच्या बाजूला जाणारी उष्णता उजव्या हृदयावर येते जेथून आपली फुफ्फुसे, श्वासोश्वास वगैरे सर्व क्रिया चालतात आणि त्यामुळे दम्याच्या विकाराचा त्रास होतो. सहजयोगामध्ये दमा बरा करणे अगदी सोपे आहे. लीव्हरमधील उष्णता कशी काढायची

हे समजलें की ते सोपे आहे. भारतात हा विकार बरेच जणांना आहे. प्रदुषणामुळेही त्याचा त्रास वाढतो; शिवाय इतरही प्रश्न निर्माण होतात कारण हे वडिलांचे स्थान आहे. वडिलांना कांही त्रास असेल किंवा वडील व मुलगा यांचे संबंध नीट नसतील तर या चक्रावर पकड येते. मुलाच्या लहानपणींच जर त्याचे वडील गेले असतील तरी पण या चक्रावर पकड येते. कांहीही असले तरी सहजयोगामधें त्यावर अगदीं सोपा उपाय आहे. मग ही उष्णता स्वादुपिंडामधें जाते आणि महत्वाचे म्हणजे त्यांच्या कार्यातही अडथळा येतो. असे झाले की आणखी एक आजार होतो तो म्हणजे मधुमेह. मधुमेहाचे मूळ कारण ही उष्णताच. टेबलावर बसुन काम करणाऱ्या लोकांमध्ये हा आजार खुप आहे पण खेड्यातल्या लोकांना नाही. महाराष्ट्रांतील खेड्यातले लोक चहामधें इतकी साखर घालतात की साखरेमधें चमचासुध्दां उभा राहील; तसं नसेल तर त्याला ते चहा म्हणणार नाहींत; इतकी साखर खाऊनही त्यांना मधुमेह होत नाही. कारण ते इतकं कष्टाचे काम करतात की त्यांना झोप पटकन लागते; त्यांना विमा, पैशाची बचत वगैरेसारख्या गोष्टींची पर्वा नसते, भविष्याची त्यांना फिकीर नसते. म्हणून भविष्याबद्दल कांही काळजी नसल्याने ते सुखी असतात. पण टेबलावर बसून काम करणाऱ्या लोकांना मधुमेहाचा त्रास हमखास होतो. मधुमेह हा विकारच मुळी अती विचार करण्यामुळे होतो. मधुमेहामधून उत्पन्न होणारा दुसरा त्रास म्हणजे अंधत्व. सहजयोगामधें याचे स्पष्टीकरण सांगता येते. स्वाधिष्ठानाचे स्थान- ज्याला "पीठ" संबोधले जाते हे डोक्यामधें आहे. आपली चक्रे व त्यांचे पीठ यांचे संबंध कसे आहेत हे मी समजावून सांगितले आहे आणि रशियन लोकांनी ते सिध्द करून दाखवले आहे. रशियामधे शास्त्र खुप प्रगत झाले आहे आणि ते लोक खुप पुढे चालले आहेत आणि त्यांचा आपल्याला खुप उपयोग होत आहे.

आणखी एक असाच वाईट विकार आहे जो सारखे कामांत गर्क असलेल्या लोकांना होत असतो, ज्यांना इकडे तिकडे बघायला फुरसत नसते इतकं त्यांचे जीवन धकाधकीचे असते. ते सकाळी उठल्याबरोबर उशीर झाला असं समजून लगेच गाडीकडे वळतात. अमेरिकेमधें तर गाडीत बसून दांत घासण्याची पध्दत आहे. त्यांची राहाणीच मूळी इतकी वेगवान झाली आहे की त्यांना सकाळची न्याहारी करायलाही वेळ नसतो; मग गाडीमधें नाही तर ऑफिसमधें न्याहारी करतात. माझ्या पतींनी मला सांगितले की त्याच्या ऑफिसमधले बरेच लोक आल्या-आल्या आधी बाथरूममधें जातात कारण त्यांना तिकडे गेल्यावर बरं वाटते. इतकं आपलं जीवन धकाधकीचे झाले आहे. सगळ्यात वाईट सवय म्हणजे उठल्या-उठल्या पेपर वाचणे. सकाळीच पेपर वाचला की सिंपथेटिक संस्था लगेच कार्यमग्न होते; तुम्हाला माहीत आहेच की लाल रक्तपेशींचा अशा आणीबाणीच्या वेळी लागणारा पुरवठा प्लीहाकडून होतो तुम्हाला अशा अडचणीच्या वेळी मदत करण्याची तिची धडधड सुरू होते. परिणामस्वरूप खुपच ताण येतो कारण अशा सतत धकाधकीने काम करण्याच्या वेडेपणाला कसं संभाळायचे तिला माहीत नसते. पूर्वीच्या काळी लोक शांतपणे जेवण करायचे; मला आठवते माझे वडील जेवायला बसले की माझी आई त्यांना पंख्याने वारा घालत बसायची आणि ते सावकाश, शांतपणे जेवायचे. आमची रहाणी अशी होती पण आतां सगळेच बदलले आहे. यामुळे या प्लीहावर सतत ताण असतो आणि हा सामना कसा करायचा हे तिला कळेनासे होते व त्यांतूनच ब्लड-कॅन्सरसारखा भयानक रोग पुढे सुरू होतो. आमच्यामधें असे सहजयोगी आहेत ज्यांचा ब्लड-कॅन्सर बरा होऊन ८-१० वर्षं झाली. आता ते अगदी बरे झाले आहेत, काम करत आहेत, त्यांच्यात कांहीच दुष्परिणाम नाहीत; त्यांना रक्त बदलावे लागले नाही काही नाही. सहजयोगातून बरे झाले, हे करणारे लोकही आमच्यात आहेत. हा फार भयानक आजार आहे आणि धकाधकीचे जीवन घालवणाऱ्या महिलांच्या मुलांनासुध्दा त्याचा त्रास होऊ शकतो. मला दिसते की महिलांचे जीवनही अति धावपळीचे झाले आहे, सतत योजना आखण्यांत, गडबडीने सगळीकडे नाचण्यांत त्या दंग आहेत. नुकतीच मी गुजरातमधील एका विद्यापीठाच्या कुलगुरुच्या पत्नीला भेटले आणि तिथे पण असंच चालल्याचे पाहून मला आश्चर्यच वाटले. "तू दिवसभर काय करतेस" असं मी विचारल्यावर ती म्हणाली, "काही नाही, नुसती बसुन राहते". "कसलं तरी प्लॅनिंग असणार !" "हो, माझ्या डोक्यांत सारखं जेवणाचे, आज जेवायला काय करायचे, पापड किंवा फरसाण करावे का असलेच विचार असतात. मी म्हटले "त्यासाठी प्लॅनिंग कसलं करायचं? बाजारांत जायचे, असेल ती भाजी घ्यायची आणि बनवायची. त्याला प्लॅनिंग कशाला? आणि समजा तुम्ही अमुक भाजी करायची ठरवले आणि ती नाही मिळाली तर?"

आपणच आपली प्रकृति बिघडवायची म्हणजे आजार येणारच. आणखी एक असाच त्रासदायक आजार म्हणजे किडनी बिघडणे. वर सांगितलेल्या उष्णतेमुळे किडनी पण खराब होते आणि लघवी बंद होते. मग डायलिसिस चालू करायचे आणि पैसे संपले की मरण बस. डॉक्टरसाहेबांनी किडनीचा त्रास असणाऱ्या एक मित्राला आमच्याकडे आणला; तो दुसऱ्यांचे डायलिसिस करत असे. मी त्याला सांगितले की तुला जर मी बरं केलं की तू हा डायलिसिसचा धंदा बंद करीन असे वचन दे. त्यानें वचन दिले, तो बरा झाला पण त्यानें धंदा चालूच ठेवला. मी त्याला कारण विचारले तर म्हणाला, माताजी मी हे मशीन विकत घेऊन इतका पैसा गुंतवला आहे की धंदा बंद करून कसं चालेल? तर सगळं काही पैशाच्या दृष्टीकोनांतून; इतकं की आपल्याजवळ जे आहे ते सोडायला आपण तयार नाही. मग

तुमच्या आतड्यांवर परिणाम होतो. इतका की पुढें कायमचा मलावरोधचा त्रास. हाही फार त्रासदायक विकार आहे. त्यामुळे तुम्ही फार अस्वस्थ होता, सारखा चिडचिडेपणा करता आणि आयुष्य खराब करून घेता. तरीही पुष्कळ लोकांना कायम हा त्रास असतो. आणि तो दूर करणे त्रासदायक असते. हे औषध घे, ते औषध घे असं करता करता पुढें मूळव्याध आणि तत्सम आजार सुरू होतात.

आपल्याला कसले कसले त्रास होऊं शकतात हे मी थोडक्यात सांगितले. पण आणखी एक गंभीर गोष्ट आहे. समजा एखादा २१ वर्षांचा तरुण टेनिस खेळणारा पण खुप पिणारा असेल तर त्याला मरणप्राय असा हार्ट-अॅटॅक नक्कीच येणार, अगदी प्रचंड झटका. कारण लीव्हरमधली उष्णता हृदयापर्यंत आली त्यांतून टेनिस खेळणे किंवा व्यायाम करणे यांतून आधीच निर्माण झालेली उष्णता आणखीनच वाढली की हृदयावर परिणाम होऊन जबरदस्त हार्ट-अटॅक येतो; आतां नाही तर पुढें कधी असा अटॅक येणारच यांत शंका नाही. तुम्ही गैरसमज करून घेऊं नका पण राहुल बजाज यांना असाच अॅटॅक आला व ते माझ्याकडे आले आणि बरे झाले. पूर्णपणें ठीक झाले आणि सध्या त्यांचे सर्व व्यवस्थित चालले आहे. हृदय विकाराचे दोन प्रकार आहेत; एकात हृदय कमजोर(आळशी) झालेले असते आणि दुसऱ्यांत ते अती काम करत असते. जास्त काम करणाऱ्या लोकांना मोठा झटका येतो आणि आळसावलेल्या हृदयामुळे (Anjina) अंजायना होतो. अंजयनामधें या अनाहत चक्रावर पकड येऊन हृदय मेंदूला रक्ताचा पुरवठा करू शकत नाही. अंजायना असा होतो पण तो अगदीं पूर्ण बरा करता येतो. आमच्यात एक बारी मल्होत्रा नांवाचे गृहस्थ आहेत. त्यांचा अंजायना पूर्ण बरा झाला. त्यांचा विश्वास बसेना म्हणून मी त्यांना म्हणाले की ठीक आहे, तुम्ही डॉक्टरला दाखवा. सगळे डॉक्टर म्हणाले की तुम्ही अगदी तंदुरुस्त आहांत, तुम्हाला अंजायना नाही. त्यांनी Angiography करून घेतली होती; आणि दिल्लीत जेव्हां मला भेटले तेव्हां त्यांची Bye-Pass Surgery होणार होती; आणि ते तसेच बरे झाले. हे एवढंच उदाहरण सांगते असं नाही. अशा तऱ्हेनें तुमची सर्व चक्रे जर ठीक केली, ती जर स्वच्छ झाली आणि तुम्ही जर परमेश्वरी शक्ती बरोबर जोडले गेलात तर तुमच्या व्यक्ति मत्वामधें पूर्ण परिवर्तन होईल; तुम्हाला स्वतःलाच ते निःशंकपणे जाणवेल; नुसते शारीरिक आरोग्यच नव्हे तर मानसिक आणि अध्यात्मिक आरोग्य पण तुम्हांला मिळेल. हे फक्त एका चक्राबद्दल झाले; त्याचप्रमाणे आपल्यामधें आणखी चक्रे आहेत जी आपली देखभाल करत असतात. शरीरशास्त्राप्रमाणें ह्याही नसांच्या पुंजक्यासारखी असतात. स्वाधिष्ठान चक्राला ते Aortic Plexus म्हणतात. हे चक्र जेव्हां डाव्या व उजव्या बाजूकडून कार्य करते तेव्हा तुम्ही निर्मिती करू लागता. तुम्ही शास्त्रज्ञ असाल तर तुम्हाला या बाह्य जगांतील घटनांच्या आड खोलवर असलेले ज्ञान सापडेल. ते सर्व कांही कार्यान्वित करू शकते. उदा. जीन्स् (Jenes) मध्येंही ते मी कार्यान्वित केले आहे, या विषयाबद्दल मी जेव्हां त्यांना सांगितले तेव्हां ते आश्चर्यचकित झाले. ते म्हणाले फॉस्फोरसवर (Phosphrous) आजवर कोणीही काम केले नाही. आणि मलाही फॉस्फोरस वर आजपर्यंत कुणीच कांही न केल्याचे आश्चर्य वाटते. डॉक्टरसाहेबांनी आत्तांच आपल्या रोगप्रतिबंधक शक्तिबद्दल सांगितले; मी पण म्हणाले होते की आपली ही रोगप्रतिबंध-क्षमता क्षीण झाली तर आजार होणारच, ती अगदी साधी गोष्ट आहे. मी तर म्हणेन की ही रोगप्रतिबंधक यंत्रणेचीच जबाबदारी आहे.

आता आपल्याला या सर्व चक्रांवरच्या देव-देवता समजून घ्यायच्या आहेत; इथे डॉक्टर अपयशी ठरले आहेत कारण त्यांना ते शक्य नाही. ते घरांत गणपती आणतील, कामाला जातांना त्याला नमस्कार करतील; पण आपल्यामधील गणपतीचे महत्व काय आहे हे त्यांना समजत नाही. ते काय करतात, कुठे असतात, त्यांचे कार्य कसे चालते समजणार नाही. इथे फक्त भारतीय देव-देवताच असे नाही; इथे ख्रिस्त आहेत, मोहम्मद आहे, महावीर आहेत, बुध्द पण आहेत. ते सर्व आपल्यामध्यें आहेत, पण डॉक्टर लोकांनी याला मान्यता देणे फार अवघड आहे; मी तर म्हणते त्यांनी मान्यता देऊच नये. सावकाशीनें सहजयोगांत त्यांची हळू-हळू प्रगति झाल्यावर ते आपोआप मानतील. तुम्हाला एकदां का मुळांतले ज्ञान-सत्य समजले की निदान करण्यासाठी रोग्याला मारायची जरूर नाही; तुमच्या स्वतःच्या हातांच्या बोटांवर तुम्हांला समजेल की कुठे काय बिघाड आहे. तुम्हीच असं नाही कुणीही आत्मसाक्षात्कारी माणुस सांगू शकेल की कुठें कोणते चक्र खराब आहे व काय भानगड आहे. सहजयोगामधें आतां हे सर्व उलगडून सोपे करून दिले आहे आणि तुम्हालाही ते समजू शकेल.

आतां इथे जे संशोधन केन्द्र चालू झाले आहे ते सहजयोगांतून रोगमुक्त झालेल्या सर्व लोकांची माहिती संकलित करणार आहे. आम्हाला रोगनिदान करण्यासाठी कसली चाचणी घ्यावी लागणार नाही कारण ते आम्हांला बोटांवरच समजणार आहे; पण तरी लोकांनी त्याचा पडताळा करून घेण्यासाठी बाहेरच्या हॉस्पिटलसमधून किंवा आणखी कुठें जाऊन दाखवायला हरकत नाही. सहजयोग पध्दतीनेच सर्व उपचार केले जाऊन आणि उपचाराची सर्व माहिती व प्रगति लिहून ठेवली जाणार आहे. डॉक्टरसाहेबांनी आधीच या विषयावर खुप काम केले असल्यानें इथल्या कार्याबद्दल खात्री आहे; दिल्ली विद्यापीठाने चार डॉक्टरांना आधीच अशाच प्रबंधांबद्दल एम.डी. पदवी दिली आहे. भारतात उत्तरेकडील डॉक्टर लोक खुपच मोकळ्या मनाचे

आहेत; पण महाराष्ट्रांत तसं नाही. हे अर्थात डॉक्टरांबद्दल नाही तर अधिकारी-वर्गाबद्दल. ते आमच्या पध्दतीला थातूर-मातूर म्हणतात; आम्हाला त्याबद्दल कांही संधी पण देत नाहीत. चार डॉक्टरांना एम्. डी. मिळाल्याचे मी सांगितलेच पण इथें फक्त एम्. बी. बी. एस्. झालेले काही डॉक्टर आहेत, त्यांना कसली नोकरी नाही, डॉक्टरी व्यवसाय, दवाखाना काही नाही आणि आमच्याविरूध्द एक ग्रुप बनवून आम्हांला त्रास मात्र देत राहतात. हे तुमच्या देशांतलंच ज्ञान आहे, त्यांने पुष्कळ लोकांचे भले झाले आहे तर मग मोकळ्या मनाने ते समजून घ्यायला हरकत कां असावी? तुम्ही जर डॉक्टर असाल तर इथे कांही फक्त पुंजी जमावण्यासाठीच नाही आलात. वैद्यकी व्यवसायांत तुम्ही पैसे कमावण्यासाठीच नाही तर नांव कमावण्यासाठी आला आहात. हे फार महत्त्वाचे आहे. कुणी जर तुमचं नांव घेतले तर हाच डॉक्टर उत्तम आहे असं म्हटल जावं, तीच मानववादी असल्याची खुण आहे. हेही फार महत्त्वाचे आहे. सहजयोगांत मनुष्य पूर्णपणे करूणायुक्त होतो. ख्रिस्ताला मानणारे जे डॉक्टर लोक आहेत ते लोक ख्रिस्तांनी अगदी थोड्या अवधीमध्ये २१ लोकांना कसे बरे केले, त्यांना हे कसे शक्य झाले याचा शोध का घेत नाहींत? त्यांनी लोकांची कुण्डलिनी जागृत केली. पण हे बायबलमधे लिहिलेले नाही. कारण बायबल ख्रिस्तांनी स्वतः लिहिलेले नव्हते. तीच गोष्ट कुराणाची, मोहम्मद साहेबांनी स्वतः कुराण लिहिलेले नाही. पण त्यांनी सांगितले होते की जोपर्यंत तुम्ही स्वतःला ओळखत नाही तोपर्यंत तुम्हाला देव सापडणार नाही. सगळ्या संतांनी हेच सांगितले आहे; पण दुर्देवाने त्यांनी स्वतः कुठलेच ग्रंथ लिहून ठेवलेले नाहीत; म्हणून सगळीकडे शंका आहेत, गोंधळ आहे. पण आतां आपण लक्षांत घेऊं या की पुष्कळ लोकांना आजारांतून बरे होण्याची, पूर्णपणे सुख-समाधान व आनंद मिळवून परमेश्वराच्या साम्राज्यांत येण्याची वेळ आतां आली आहे. शास्त्रज्ञांसमोर देवाबद्दल बोलणेसुध्दा फार कठीण आहे; पण ईश्वर आहेच आणि शास्त्रज्ञांनी म्हणजेच तुम्ही तो खरा आहे का नाही हे प्रथम शोधण्याचा प्रयत्न करा. त्याऐवजी तुम्ही ईश्वर नाहीच असंच म्हणत बसाल तर तुम्ही शास्त्रज्ञ कसे म्हणवून घेता? तुम्ही स्वतः ईश्वर आहे का नाही हे शोधलं आहे का हा मुद्दा आहे; म्हणून मी म्हणते तुम्ही सर्वांनी अगदी नम्र होऊन असा प्रयत्न करायला हवा, ईश्वर जर असेल तर शास्त्रीय पध्दतीनें त्याचा खरेपणा शोधण्याचा आपण प्रयत्न करू या असा विचार करा. मला हेही सांगायला हवे की डॉ. रावसाहेब अगदी मोकळ्या मनाने बोलले आहेत; त्यांनी जगांत अनेक ठिकाणी प्रवास करून हे सर्व प्रत्यक्ष करून दाखवले आहे; जगांतील बऱ्याच डॉक्टरांना त्यांचे म्हणणें पटले आहे आणि योग्य वेळी हे सर्व कार्यान्वित होईल याची मला खात्री आहे.

आपला देश गरीब आहे, फारच गरीब आहे हे तुम्हांला माहीत आहे. सहजयोगामधे कशालाही तुम्ही पैसे घेऊं शकत नाही; तुमच्याजवळच्या शक्तीमधून सर्व काही घडत असते. गरीब लोकांना तुम्ही खूप मदत करू शकता. कुठे खूप श्रीमंत लोक असतील तीही उपयोगी पडण्यासारखी असतील; पण आपल्याला त्यांच्या फार मागे लागण्याची जरूर नाही. एरवी त्यांनाही आपल्याबद्दल काही आस्था नसते. त्यांना फक्त डॉक्टरच लागतात तेवढ्यापुरता तुम्ही त्यांच्याशी संबंध ठेवा. पण आपल्याला मध्यमवर्गीय आणि त्याखालचे गरीब लोक, विशेषतः ज्यांच्याजवळ डॉक्टर कडे आणि हॉस्पिटलमधे जाण्याची ऐपत नाही अशा लोकांकडे जास्त लक्ष द्यायचे आहे. इथे आपण एक तीन हॉल्सचा एक वेगळा विभाग ठेवला आहे जो ज्यांना अजिबात पैसे खर्च करण्याची ऐपत नाही अशांसाठीच आहे. पण इथे राहणाऱ्या लोकांकडून घरभाड्यासारखे काही पैसे घ्यायला हवे; या संस्थेचा खर्च, डॉक्टर मंडळींना व नर्सेसना पगार इ. खर्च तर भरून यायलाच हवा. अशा तऱ्हेनें पैशाची व्यवस्था करावी लागेल. पण या सर्वांतून आपल्याला नफा अजिबात नको आहे. याबाबतीत मी फार कडक आहे आणि सगळेजण ते जाणतात. पण पैसा हा अशी गोष्ट आहे की आजारपण चालूच राहणार आणि त्याकरता पैसा लागणारच पण पैशाचा लोभ नेहमी वाढतच असतो; काही लोक भिंतीवर नोटा चिकटवून शोभा करण्याइतके वेडे असतात, मुर्खपणा करतात. डॉक्टर मंडळींनी आदर्शवादी असायला हवे; मला तर तसा नेहमी विश्वास वाटत आला आहे. या भूमिकेतून आपण आपल्या गरीब बांधवांना कशी मदत करू शकतो, त्यांची कशी काळजी घेऊं शकता याचा विचार करा.

हे शास्त्र शिकायला तुम्हाला मुळींच पैसा लागत नाही, एका महिन्यांत ते शिकण्यासारखे आहे. वैद्यकशास्त्राची पदवी मिळायला तुम्हाला सात वर्षे कष्ट करावे लागतात. डॉक्टर लोकांना हे शिकण्यापासून विशेष फायदा आहे कारण ते त्रास कुठे आहे हे ओळखू शकतात आणि हे शास्त्र जास्त चांगल्या तऱ्हेने समजू शकतात; सहजयोग हा एक शास्त्रीय उपचार आहे हे पण ते समजू शकतात. हे सर्व इतक्या सुंदर तऱ्हेनें कार्यान्वित होत आहे हे पाहूनच ते आश्चर्यचकित होतात. खरं तर हे इतके प्रगत शास्त्र आहे की त्याला डॉक्टरसाहेबांनी सांगितल्याप्रमाणे महा-शास्त्र असेच म्हणायला हवे. हे शास्त्र तर्कशुध्द पध्दतीनें सांगू शकते. अर्थात शास्त्र पूर्णत्वाला पोचू शकत नाही; ते एक लहान कपासारखे आहे आणि विश्वातील सर्व ज्ञानसागराला समावून घेऊं शकत नाही. म्हणून जे शास्त्रज्ञ शास्त्रालाच परमोच्च मानतात त्यांनी आपल्या देशामधें ज्ञानाचे केवढे मौल्यवान भांडार आहे ते समजून घ्यायचा प्रयत्न करावा.

ईश्वराचे तुम्हां सर्वांना अनंत आशीर्वाद.

# श्री गणेश पूजा

## १९८७, पुणे

## (भाषणाचा सारांश)

निराकारात जे ब्रम्ह आहे, तेच साकारात साक्षात् श्रीगणेश आहेत. आतापर्यंत त्यांच्या गहनतेवर फार कमी विचार केला गेला आणि त्यांच्यावर जे काही सांगितले गेले, ते सर्वांनी मान्य केले. परंतु त्यांचे विवरण, विश्लेषण झाले नव्हते. त्याचे कारण हे आहे की त्यावेळी आपल्यासारखे सहजयोगी नव्हते, जे चैतन्याने काठोकाठ (आज) भरलेले (न्हालेले) आहेत. जे चैतन्याला जाणत आहेत आणि ज्यांची विवेक शक्ति सर्वसामान्य लोकांपेक्षा फार उच्च आहे. विवेकाचा (सुझ और बुझ = सुझ म्हणजे कल्पना, पहाण्याची शक्ति, दृष्टी, आकलन. बुझ म्हणजे ज्ञान, आकलन शक्ति.) अर्थ कधी कधी लोक असा समजतात की जे तर्क आणि बुध्दीने समजले जाते. हे जे संस्काराने आपल्या आत अंकीत होते, तोच सर्व काही विवेक (सुझबुझ) (प्रेम) असतो. अशी गोष्ट नाही. विवेक (सुझ-बुझ) जो आत्म्याच्या प्रेरणेने, आत्म्याच्या प्रेरणेने, आत्म्याच्या ज्ञानाने मनुष्यामध्ये एक अद्वितीय असा नवा 'आयाम' बनवते, त्याला विवेक (प्रेम) (सुझ-बुझ) म्हटले जाते. हा विवेक (सुझ-बुझ) (प्रेम) देणारा, लोक म्हणतात, श्रीगणेश आहे, तर ते कसे ? हा विवेक (सुझ-बुझ) आम्हाला श्रीगणेश कशा प्रकारे देतात, हे सहजयोगी अत्यंत सरळपणे सांगू शकतात. कारण ज्यावेळी आपण 'पार' होऊन जाता, आपल्या आतून चैतन्याच्या लहरी वहाण्यास सुरुवात होते, तेव्हा आपण केवळ एक मात्र सत्यालाच जाणता. 'ॲब्सल्यूट' (शुध्द, पूर्ण)' ला जाणता. ही श्रीगणेशांची जादू आहे.

श्रीगणेशच चैतन्यमय होऊन आपल्या आतून वाहतात. आणि तेच साकार होऊन या चैतन्याला वाहू देतात. ज्यावेळी आपण कोणत्याही वस्तु, प्राणिमात्र किंवा मनुष्याच्या चैतन्याला जाणू इच्छिता तेव्हा आपण जो त्याकडे हात पुढे करतो, तत्क्षणीच आपण जाणू शकता की या वस्तुमध्ये काय दोष आहे, काय गुण आहे. किंवा ही वस्तु स्वयंभु आहे किंवा नाही, याचे पूर्ण ज्ञान आपल्याला होऊ शकते, जर आपली ती स्थिती झाली तर ! या ज्ञानाला देणारे, या विवेकाला (सुझ-बुझ) देणारे श्रीगणेश आहेत कारण तेच चैतन्य बनून आमच्या आतून वाहतात आणि जेव्हा ते चैतन्य बनून आमच्या आतून वाहतात, तेव्हा त्यांचे जे काही जाणायचे आहे, ते आम्ही सुध्दा जाणू शकतो. ते आमच्याच नसानसातून जाणले जाऊ शकते. आपण सुध्दा आळखू शकतो की ही चैतन्य द्वारा ज्ञान होणारी ज्या काही गोष्टी आहेत, त्या बिल्कुल 'सत्य' आहेत, ॲबसल्युट आहेत. त्यात द्वैत नाही. त्यात काही संशोधन करायची गोष्ट नाही. त्यात कसली मोठी समजदारी ठेवून, आपापसात त्यात वार्तालाप (चर्चा) करून कसल्याशा समझोत्या (निर्णयावर) वर पोहचण्याची (ही) गोष्ट नाहीय. जे आहे ते 'हेच' आहे आणि याच्याशिवाय (अन्य) नाहीय.

जेव्हा हे गणेश आमच्या आत जागृत होतात, तेव्हाच आमच्या आतून ही शक्ति वाहण्यास सुरुवात होते.

आता आपण म्हणाल की, माँ कुंडलिनी तर त्याची माँ (आई) आहे आणि श्रीगणेश खाली बसलेले आहेत तर हे कशा प्रकारे घटित होते ?

सात चक्रांतून श्रीगणेश चैतन्य वाहून आपले अस्तित्व दाखवतात की आम्ही आहोंत. आता प्रत्येक ठिकाणी, जेथे जेथे श्रीगणेश आहेत-जसे आपल्या येथे ऐकले असेल की तऱ्हेतऱ्हेचे श्रीगणेश आहेत. कुणाचे नाव आहे उंबऱ्या गणपती, कुणाचे नाव काही आणखी गणपती तर कुणाचे नाव अन्य काही गणपती आहे. कामाच्या अनुसार, त्याच्या कर्माच्या अनुसार, कार्याच्या अनुसार त्याचे गणपती आहेत. याप्रमाणे प्रत्येक चक्रामध्ये जे श्रीगणेश बसले आहेत, ते गणेश त्या त्या स्थानाच्या

त्या त्या चक्राच्या अनुसार कार्यान्वित होतात. जसे की समजून घ्या, नाभी चक्रात श्रीगणेशांचे स्थान काय आहे, तर नाभी चक्रात श्रीगणेश शेषाच्या (नागाच्या) तोंडातून वाहत असतात. 'शेषनाग', जो की आमच्या श्रीविष्णूची शय्या (निद्रास्थान) आहे. त्याच्या आतून ते (श्रीगणेश) त्याच्या फुत्काराच्या बरोबर वाहतात आणि त्या वेळी त्याचा फुत्कार सुरु होतो चैतन्याचा ! तर आपण पाहताच की आपल्या पोटाच्या भागात एक प्रप्रकारचे स्पंदन जसे आपल्याला जाणवते त्यालाच लोक 'परावणी' म्हणतात. या परावणीला पुढे चालल्यावर (पुढे गेल्यावर) दुसऱ्या वाणींची नावे आहेत. परंतु 'परा' वाणी जे स्पंदन आहे, तेच श्रीगणेशांची कृपा आहे. म्हणून आपल्या सहजयोगींसाठी श्रीगणेश पुष्कळच महत्वपूर्ण गोष्ट आहे. श्रीगणेशांच्या सांगण्याशिवाय, त्यांच्या परवानगीशिवाय कुंडलिनी उठणार नाही. या मामल्यात कुंडलिनी आपल्या मुलाचे म्हणणे ऐकते. असे तर आईचे म्हणणे मुलगा प्रत्येक बाबतीत ऐकतोच आणि आपण जाणताच कीं श्रीगणेश तर पूर्ण तऱ्हेने आपल्या आईला समर्पित आहे. ते तर आपल्या वडिलांना नाही जाणत. परंतु ही जी कुंडलिनी आहे, ती श्रीगणेशांचे म्हणणे ऐकते.

ज्या वेळात तिचे उत्थापन होते (त्यावेळी). कारण मनुष्याच्या बाबतीत जे ज्ञान आहे ते सांगतात की हा मनुष्य जागृतीसाठी योग्य नाहीय, यात ते भोळेपण, साधेपण (सरळ वागणूक) नाहीय, त्याच्यात ते प्रेम नाहीय, याने पुष्कळ दुष्ट काम केले आहे. आणि त्याची कुंडलिनी जागृत करणे ठीक नाहीय तर कुंडलिनी माँ तेथेच बसून राहते. आणि जर कोणत्याही प्रकारे विचारीला फार प्रेम उचंबळून आले आणि ती वर चढली, वरपर्यंत आली सुध्दा, तरी देखील त्याला घसटून खाली, परत कुंडलिनी धाडकन खाली पडली ! तर श्रीगणेशांचे कार्य अत्यंत अचूक आणि अत्यंत महत्वपूर्ण आहे आणि कारण ते एकमेव सत्यालाच जाणतात. ते असत्याचे चालू देत नाहीत. त्यासाठी त्यांच्या हातात एक परशू (शस्त्र) देखील आहे.

आता जे लोक गणेशतत्वाला जाणू इच्छित आहेत आणि (त्यात) उतरु इच्छित आहेत आणि गणेश तत्वामध्ये सामावून (एकरुप) जाताहेत, (म्हणजे) फक्त श्री गणेशांचीच भूमिका या मूलाधार चक्रावर आहे. तिच्यातच (ते) एकरुप होतात.

जणू काही असे लोक की (जे) स्वतःला मोठे संन्यासी, ब्रम्हचारी इत्यादी बनवून राहतात. त्यांच्या आतमध्ये (देखिल) एक अशी असंतुलन (असणारी) दशा (स्थिती) येते की जेथे श्रीगणेश एकाच प्रकारचे होतात. एकांगी श्रीगणेशांची, आपल्याला माहित आहे की सात स्वरुपे आहेत. आणि ते सात स्वरुपात न उतरणाच्या कारणामुळे एकाच स्वरुपात बसून राहतात. एकच गणपती जर पुण्यामध्ये राहिला तर येथे काही आल्हाद आणि उल्हासच येणार नाही. लोकांना मजा देखिल येणार नाही. म्हणजे त्यांचे जे सात प्रकार आहेत, त्या सात गणपतींना आपण जाणले पाहिजे आणि जोपर्यंत ते आपल्या आत जागृत होणार नाहीत तर (तो पर्यंत) आपण एक अजब (विचित्र) प्रकारची आपल्या स्वतःकरीता आणि दुसऱ्यांकरिता समस्या बनून राहिल. आता जे लोक फार फार गणपतीची सेवा करत आले आहेत आणि गणपतीलाच मानून राहिले आहेत आणि ब्रम्हचर्यामध्ये लीन आहेत आणि विवाह देखिल केला नाही आणि कोणत्याही स्त्रीकडे पाहिले देखिल नाही इत्यादि इत्यादि प्रकार केले ते सरळ आपल्या पिंगला नाडीवर चढतात. पिंगला नाडीवर चालल्याने श्रीगणेशजी एका तऱ्हेने सुटून जातात. (दूर होतात). कार्तिकेय यांचे रुप (तेथे) येते. पिंगला नाडीवर चालल्यावर असे लोक फार क्रोधी होतात. श्रीगणेश सौम्य स्वरुप आहेत. अत्यंत सौम्य आहेत. त्यांच्यात सौम्यातच त्यांचा मुलधर्म आहे. कोणती वस्तू ज्यास्त भडकते तेव्हा तिला थंड करण्यासाठी श्रीगणेशांचा उपयोग करतात. त्यांचे टेंपरेचर (तपमान) २७२ अंश आहे. कोणती वस्तू जास्त गरम झाली, तेथे श्रीगणेश ठेवून द्यावेत, ती वस्तू थंड होऊन जाईल. कुणा व्यक्तीची तब्येत जास्त बिघडली तर तिला श्रीगणेशांच्या हवाली करावे तर त्या व्यक्तीचा ताप उतरून जाईल. कुणी जर फार क्रोध करत असेल तर श्रीगणेश दाखवावा, ती (व्यक्ती) थंड होऊन जाईल. परंतु राईट साईडने (उजव्या बाजूने) ते वर येऊ लागतात, तर या नाभी चक्रात जो शेषनाग आहे. त्याचा फुत्कार गरम होतो आणि असे लोक गरम होऊ लागतात. आणि गरमपणाच्या कारणाने त्यांचा आत जो काही गरमपणाचा तर त्रास होतोच. परंतु सर्वात अधिक ही गोष्ट आहे की त्यांच्यात फार क्रोध येत असतो. परंतु श्रीगणेशांचे जेवढे गुण आहेत, ते अत्यंत थंड लोक आहेत. आणि ते थंड डोक्यानेच काम करतात.

अमेरिकेत, पत्ता नाही की तिने आपल्या अशा काही धारणेने किंवा होऊ शकते की काही मननाने किंवा परमात्म्याच्या कृपेनेच एक तेथे वस्तु बनवली आहे, जिला 'स्मार्क' म्हटले जाते. लहान लहान गण जसे बनवले आहेत. बिलकुल ते गण आहेत. आणि त्यांच्या सर्व हरकती, पध्दती, त्यांचा सर्व काही व्यवहार गणाप्रमाणे आहे. आणि आता हे ज्यांनी विचार करुन बनवले किंवा ज्याच्या डोक्यात ही गोष्ट आली असेल, असू शकते की तो रिअलाइजड् सोल (आत्म साक्षात्कारी) असावा. आणि त्यांचे सर्व कपडे निळ्या रंगाचे असतात. एकदम शुध्द असा निळा रंग ते वापरतात आणि

त्याच्या बरोबर सफेद रंग. त्याच्या बाकी वस्तु (अवयव) - हात, पाय सफेद रंगाचे ! त्याच्यात फारच खुबीची गोष्ट ही आहे की ते नेहमी सत्कर्मात गर्क असतात, आणि शांत चित्त आहेत. जर श्रीगणेशांचे गण शांत चित्त नाहीत तर जगाचे सर्वकाही विध्वंस होऊन जाईल.जेवढ्या आपल्या येथे आजकाल विध्वंसक शक्ती चालू आहेत, त्यांना आडवणारे जे आहेत, ते श्रीगणेशांचे गण आहेत. कोठेही आपण पहावे, जेथे युध्द होते, त्याला खतम् करण्याचे (थांबवण्याचे) काम जे आहे ते श्रीगणेशांचे गण जाऊन करतात. आता मी आपल्याशी बोलत आहे. याचा अर्थ हा नाही की आपण पूर्ण प्रकारे त्याला (बोलण्याला) मानावेच. परंतु आहे ही अशी गोष्ट. आता आपण जर गण स्वरुप आहात, तर आपल्यामध्ये शांत चित्त फार जरूरीचे आहे. आपल्यात क्रोध आहे तर आपण गणेशाच्या विरोधात जात आहात. फक्त श्रीगणेशांना अधिकार आहे की आपले (शस्त्र) चालवण्याचा. कारण ते स्वतः ज्ञानाची मूर्ती आहेत आणि या स्वं-विवेकाचा (सुझ-बुझ) स्त्रोतआहेत. परंतू मानवाला अधिकार नाहीय की त्याने आपल्या - क्रोधाचे बळी व्हावे. क्रोधासाठी नेहमी माणूस जेव्हा क्रोध करतो, तेव्हा तो आपल्यासाठीसुध्दा वाईट असतो. कारण त्याचे नुकसानच होते. नंतर तो पश्चाताप सुध्दा करू शकतो, जर त्याच्यात इतका संवेदनशील 'मानव' असला तर ! परंतु संवेदनशील नसला तर, तो हे म्हणतो की मी यासाठी नाराज झालो, जसे श्रीगणेश म्म्हणतात की मी यासाठी शुध्द केला की लोक आईच्या विरुध्द बोलत होते 'हे झाले नि ते झाले' आणि मी आईच्या सेवेत आहे'. आईचे मी रक्षण करतो. मी आईवर प्रेम करतो. सर्वात मोठे रक्षण आईचे आहे. 'आपसी प्रेम' (आपापसातलं प्रेम) जे गणांना केले ते केले पाहिजे. गणामध्ये इतके 'आपसी प्रेम' (आपापासातलं प्रेम) आहे. इतकी त्यांच्यात आपापसात ओळख आहे की ज्यावेळी बारा वर्षांचा मुलगा होतो, तेव्हा आपल्या या मध्य हृदयाचे जे चक्र आहे अनाहत, बारा वर्षापर्यंत तेथील ॲन्टीबॉडीज (उपद्रव नाशक संरक्षक) जी हृदय चक्राच्या चारी बाजूला फिरत असतात.

आणि जर बाहेरच्या शक्ति वार करतात आणि हे जितके ॲंटीबॉडीज आहेत ते चारी बाजूला आपल्या शरीरात पसरतात आणि चारी बाजूला शरीरात पसरुन, जर कोणी सुध्दा आपल्या शरिराला आघात करेल किंवा आपल्या शरीरावर कोणताही वर्षाव होत असेल किंवा कोणतीही परकीय सत्ता आपल्यावर काबू (हुकमत) वाढवत आहे, जे काही परमात्म्यापासुन अस्पॅश्य आहे, त्याचा ती सामना करते. त्याच्याशी लगडत आणि शांत चित्त आहे. त्या परकीय सत्तेला जाणण्याची शक्तिच त्या गणामध्ये राहते. नाहीतर आपण आपापसात (आपल्या आपल्यातच) लढत राहिलो तर त्याचा काय अर्थ आहे ? जर गण आपापसात लढत राहिले तर असा गणांचा समुच्चय ज्या शरीरात असेल (तर) त्याचे काय हाल होतील ? जे गण सर्व एकाच कार्यासाठी नियुक्त झाले आहेत, ते जर आपसात लढाई करू लागलेतर त्यांचकडून अशी तर कोणती लढाई होऊ शकत नाही. जर समजा, की आम्ही लढत आहोत इंग्रजांबरोबर आणि आपापसात इंग्रजांना सोडून आपापसात मारेण ठोकणे सुरु केले तर इंग्रज म्हणतील, चांगले झाले, मरा. त्यांनी हेच केलं की आपसात लढा, मरा आणि तेच आम्ही आजसुध्दा करत आहोत. आपल्या देशात पूर्ण वेळ हेच चालत आहे की याला मारा, त्याला मारा. त्यांना मारा यांना मारा - या सर्व गोष्टी येतात कोठून ? येतात त्याच क्रोधातुन आणि हा क्रोध येतो आपापसातल्या संघर्षातून. आपापसातला संघर्ष जेव्हा होतो तेव्हा (क्रोध) येतो. याचा आपण विचार करत नाही की आम्ही सर्व गण आहोत. आणि कएाच कार्यासाठी उद्यत आहोत आणि यात काहीच अर्थ नाही की आम्ही आपापसात लढत आहोत.

असे गण असण्यापेक्षा, कोणीच गण नसणे हे चांगले. कारण कमीत कमी (निदान) लढाई झाली नसती. परंतु गण येण्याने जर लढाई होतेय, तर अशा गणांचा काय फायदा ?

आणि त्यावर कसे त्याचे देखिल बौध्दिक उत्तर मिळते, ते (म्हणजे) असे की आम्ही यामुळे केले, त्यासाठी केले या सर्व गोष्टीमुळे जो कुणी सहजयोगी आहे, त्याचे कार्य जे आहे तो (एक) महत्वाचा क्षण विफल होतो.

आत्ता त्याचे अनेक प्रकार आहेत की मुंबईवाले असे आहेत तर दिल्लीवाले असे आहेत; तर फलाने असे आहेत नि ठिकाणे असे आहेत (हे असे तसे आहेत), हे (सर्व) ऐकून ऐकून, मला मोठे आश्चर्य वाटते की जर सर्वांची आई एकच आहे तर कोण दिल्लीवाले आणि कोण मुंबईवाले ? आणि या प्रकारची जोपर्यंत 'एकात्मता' (एकता भाव) आपल्या आत येणार नाही तोपर्यंत आपण लोक सहजयोगी नाही. ही एकात्मता (समदृष्टि) येण्यासाठी प्रथम आत पाहिले पाहिजे. काय आमच्या आत कुणाबद्दल जेलसी (द्वेष) आहे ? आपण दुसऱ्याची मजा उडवायची नाही जाणत ? जे आपण आपल्या आत हे बनवले आहे - हा विचार हा अहंकार किंवा ज्या या अशा प्रकारच्या गोष्टी जशा आपल्यासाठी शोभनीय नाहीत - ज्याच्या सहाय्याने आपण दुसऱ्यांवर बिघडवता. जे आपले स्वतःचे (सहजयोगी) आहेत. जे आपलेच हात आहेत, हेच हात, हा ह्याच्याजवळ लढेल तर याला काय म्हटले जाते ?

# संगीत व सहजयोग

**श्री गणेशपूजन पूजा, पुणे, मुक्तांगण, ३० ऑगस्ट ८७ -**

**(प. पूज्य श्री माताजी यांनी पुणे येथे संगीत कार्यक्रमानंतर केलेला उपदेश)**

डॉ. पटवर्धन आणि श्रीमती पटवर्धन या दोघांनी आज तुम्हाला जे सुश्राव्य गायन ऐकवलं आहे. त्यात एक विशेष गोष्ट माझ्या लक्षात आली की, अत्यंत विचारपूर्वक, निवडकअसेच सगळे गायनाचे प्रोग्रॅम झाले, म्हणजे आता संगीतामध्ये मला ऐवढे काही गहन माहिती नाही, हे सगळे डॉक्टर्स आहेत, पण तरीसुध्दा त्यांच्यातले जे गम्पे आहे ते हे की, 'चैतन्य हे ह्या सुरातून वाहत असतं' आणि 'भारतीय संगीत हे खरोखरच ब्रम्हातूनच निर्माण झालेलं आहे' 'ओंकाराच्या हुंकारावरच निर्माण झालं आहे' यावद्दल मला मुळीच शंका राहिलेली नाही. कारण परदेशामध्ये जवळजवळ आता १४ देशांमध्ये आपलं सहजयोगाचं कार्य चालू आहे. आणि बिस्मिल्ला खान आता परवा आले होते ते म्हणाले, माताजी ! तुम्ही हे काय निर्माण केलंय ! मला हे समजत नाही ? हे कोणत्या शाळेत गेले नाहीत ? कोणच्याही गुरकडे शिकले नाहीत ? ह्यांना ही विद्या कशी आली ? हे कशी बरोबर दाद देतात ? जसं काय आम्ही आपल्याच देशात बसून गातोय, वाजवतोय ! असं वाटतय. तेव्हा आलं कसं ? मी म्हटलं ! 'जेव्हा आत्म्याचा पूर्ण प्रकाश येतो, तेव्हा हे स्वर्गीय संगीत फार सुंदर मनोगत होतं' सगळं काही समजायला लागतं. इतके कठीण राग, मालवासारखे राग इतक्या तन्मयतेने ऐकत होते, आणि जागा सोडायला तयार नव्हते.

तसंच आपल्या भारतीय सहजयोगामध्ये ही जाणीव यायला पाहिजे, की 'संगीताला तुम्ही अत्यंत महत्व दिले पाहिजे' 'भारतीय संगीत हे परमेश्वराकडून आलेलं संगीत आहे'.

आज आपल्या देशामध्ये ही जी दुर्दशा दिसते संगीकारांची, संगीताची हे पाहून फार दुःख होतं. आम्ही फार जुने आहोत, आम्ही पुष्कळ लोकांना ऐकलं आहे आणि त्यावेळी जे लोक होते, त्यांना ऐकणारेही पुष्कळ होते व समजणारेही पुष्कळ होते. पण आजसुध्दा आपल्या या सहजयोगाच्या सर्व मेळाव्यात सगळे लोक फार दर्दी आहेत. तेव्हा आपल्याला आनंद झाला असेल की, असे लोक आपल्या समोर बसले आहेत.

परत सांगायच म्हणजे की इतकी सुंदर मनःपूर्वक भजन म्हटली, सगळे लोक रंगून गेले, त्यांच्या हृदयाला हे सगळे शब्द भिडलेले आहेत.

कारण आमच्यासाठी ज्ञानेश्वर म्हणजे फार मोठे आहेत, गोरा कुंभार आहेत हे सगळे आमचेच आहेत आणि त्यांच्या तुम्ही इतके सुंदर बीनचूक ज्या काही सुंदर संगीतामध्ये बसविलेल्या चाली वगैरे होत्या त्या इतक्या आवडल्या लोकांना. त्यांना समजेना त्यांचं अभिनंदन कसं करायचं, तेव्हा तुमच्या मध्ये ते टाळ्या वाजवायला लागले तेव्हा त्याबद्दल तुम्ही त्यांना क्षमा करावी.

तसंच पटवर्धन साहेबांचं मला मोठं कौतुक वाटतय, त्यांच्या वडिलांना मी अनेकदा ग्वाल्हेरला ऐकलेलं आहे. त्यांचा आवाज एक दुसऱ्या तऱ्हेचा होता पण त्यांच्या आवाजात एक दुसराच गोडवा आहे, अत्यंत गोड आवाज आणि असा गोडवा अत्यंत कमी पुरुषांच्या आवाजात सापडतो.

मला फार मोठे आश्चर्य वाटलं की, ह्या गोडव्याने हे गात होते ! केवढी तयारी ! माहिती आहे त्यांना ! परमेश्वर तुम्हां उभयतांना अनंत आयुष्य देवो ! तुमच्या हातून संगीताची अशीच सेवा होवो, परमेश्वराची सेवा होवो. असाच आमचा आशिर्वाद आहे.

आता राऊत साहेबांनी जो तबला वाजवला, ते आपल्याला माहित आहे की, 'ताल हा परत आपल्याला शिवापासून मिळाला आहे'. आणि ह्या वयात असे तबलजी आहेत. पण पुढच्या पिढीला असं विचारायला पाहिजे की, असे लोक तयार होणार आहेत की नाहीत ? पुढच्या पिढीला तुम्ही शिकवलंय की नाही ? काय दिलय का नाही ? हा एक प्रश्न आहे. पुढच्या पिढीमध्ये ? कसले तरी विक्षिप्त तऱ्हेचे वेताळी काहीतरी वाजवत सुटतील, तेव्हा हे उत्तरदायित्व तुम्हां संगीतकारांवर येणार आहे. आपण ही कला दुसऱ्याला दिली पाहिजे.

आपण फारच सर्वांचं मनोरंजन केलं त्याबद्दल आम्ही आपले सगळे फार आभारी आहोत.

तसंच ही दोन मुले - मला फार आनंद झाला, संगीतामध्ये ही दिक्षीतांची मुले आहेत, तरुण मुलं आहेत, दिक्षीतांनी हे फार चांगलं वळण लावलंय.

तसंच तुम्हीसुध्दा सर्व सहजयोग्यांनी आपल्या मुलाला संगीतामध्ये तज्ञ केलंच पाहिजे, संगीत हे शिकवलंच पाहिजे, 'संगीताशिवाय सहजयोग साधणार नाही'. हे जाणलंच पाहिजे आपल्याला. हे आपल्याला परमेश्वराचे फार मोठे देणे आहे. परत 'हा आपला वारसा आहे, महाराष्ट्राचा, तेव्हा आपण त्या वारशाला, ह्या आपल्याला मिळालेल्या एवढ्या मोठ्या देणगीला वाया घालवून उपयोगाचं नाही'. आणि सहजयोग तुम्हाला जमायचाच नाही, संगीताशिवाय !

कृपा करुन सगळ्यांनी आपल्या मुलांना तरी संगीत शिकवलं पाहिजे. जरी गाता आलं नाही तरी समजतां आलं पाहिजे. एवढं आलं तरी पुष्कळ झालं !

तेव्हा तुम्ही संगीताची सेवा करता त्याबद्दल आम्ही आपले अत्यंत आभारी आहोत. परतपरत आपलं (संगीत) ऐकायला मिळेल अशी आशा बाळगते.

# प. पू. श्री माताजींचे प्रवचन

## २६ डिसेंबर १९८६
## अंगापूर

मुलांना पाहून गहिवरून येते ही समजण्याची क्षमता तुम्हा आयांना असू शकते. मुलांना असू शकते कारण हा देश आईचा देश आहे. आईची थोरवी येथे मानलेली आहे. आणि महाराष्ट्रात ही आई ही एक सुज्ञ बाई आहे.

आपल्या अंगापूरच्या योगभूमीत आधी श्री रामदास स्वामींनी तपश्चर्येने पुष्कळ कार्य करून ठेवलेले आहे. परवा श्री तुकारामाच्या भागात एक अभंग म्हणून दाखविला. त्यात ते म्हणाले की मी तुम्हाला निरोप द्यायला आलोय. एक महत्वाचा निरोप की हा मार्ग, परमेश्वराचा मार्ग, फार सरळ, सहज आणि सुलभ होणार आहे. सर्व साधुसंतांनी आपल्यावर फार मेहेरबानी केली. त्यामुळे आज महाराष्ट्रात ही जाणीव आहे की 'आत्मसाक्षात्काराशिवाय दुसरं काही सुध्दा जगात मौल्यवान नाही' पण ही जाणीव इतर देशात नाही की किंवा आपण असं म्हणू या ही जाणीव हिंदुस्थानात फार कमी आहे. ही आपल्या महाराष्ट्रात संतांची फार मोठी देणगी आहे आणि तो वारसा त्यांनी इथे जिथे म्हणून ज्ञानेश्वरीसारखी सुंदर कविता वचने, अनेक ग्रंथ लिहून लोकांमध्ये ही जागृती दिली की, 'आत्मसाक्षात्कार म्हणजेच परमेश्वराला मिळवणे आहे आणि त्यातच सर्व काही आहे' त्या संतांच्या सांगण्यावरुन आणि त्यांच्या बोलण्यावर विश्वास ठेवून त्या दिवसाची वाट पाहणे हे सुध्दा काही तरी विशेषख पूर्व सुकृतामुळे घडते आणि असं वाटलं पाहिजे की अंगापूर आणि सातारा जिल्ह्यातील जे लोक इथं आलेले आहेत त्यांचे काही तरी पूर्वपुण्याई ही फार असली पाहिजे. पूर्व सुकृत फार एकत्र केलं असलं पाहिजे म्हणून आज या ठिकाणी इतके लोक मला सहजयोगी दिसत आहेत.

सहजयोगाचे लाभ किती आहेत ते तुम्हाला माहिती आहेत. ते परत परत काय सांगावेत, पण एक गोष्ट सांगावीशी वाटते की परमेश्वश्वरानी ही सर्व सृष्टी रचली, हे सगळं विश्व निर्माण केलं आणि पृथ्वी एक विशेष स्वरुप तयार केली. त्याला कारण काय ? असं परमेश्श्वरानी कां केलं ? असा एखाद्याने प्रश्न विचारला तर त्याच उत्तर असं आहे की, परमेश्वर काय आहे ? त्याचे गुण काय आहेत ? त्याचा स्वभाव काय आहे ? तो कोण आहे ? ते पाहण्यासाठी त्याला एक आरसा पाहिजे होता. जसं सोन्याला कळत नाही की सोनं काय आहे ? सूर्याला कळत नाही की त्याचा प्रकाश काय आहे ? चंद्राला दिसत नाही की त्याच्यावर डाग आहे ? म्हणून ही सृष्टीची रचना झाली की परमेश्वरानी आपल्यासाठी एक सुंदरसा आरसा बनवावा आणि तो आरसा परमेश्वरांनी घडवला, वाढवला आणि उत्क्रांती करत करत आज तो मानवाच्या हृदयामध्ये आरसा स्वरुप, प्रकाशिला. त्याच परमेश्वराचं दर्शन आपल्याला होणार आहे. तेव्हा आत्मसाक्षात्कार झाल्याशिवाय परमेश्वराला काही जाणता येणार नाही. ही गोष्ट खरीच, त्याचीच तळमळ आहे हे बरोबरच आहे. त्याला त्याच स्वतःचं दर्शन नाही. पण जेव्हा तो स्वतःच दर्शन घ्यायला निघाला तेव्हा मानवात त्याला एकाहून एक विचित्र लोक दिसू लागले. विक्षीप्त लोक दिसू लागले. आपापसात भांडाभांडी, एक दुसऱ्याचा गळा कापणे, पैशाच्या मागे धावणे, खोट्या गोष्टींच्याकडे लक्ष देणे म्हणजे जे काही परमेश्वराचे प्रेमतत्व आहे त्याच्या विरोधात वागणे, दुसऱ्यांना त्रास देणे. तापविणे, वाट्टेल त्या तऱ्हेचे खुळक प्रकार, वाष्कळपणा ज्याचं की आम्ही वर्णनही करू शकत नाही की जे तुम्ही रोजच पेपरात वाचता. हिंसाचार, देवाच्या नावावर वाट्टेल त्या गोष्टी लोकांनी

केल्या. देवाच्या नावावर एक दुसऱ्याला मारायला सुरुवात केली. असं कसं होईल ! आहो ! जर आरशातील कण नी कण आपापसात भांडू लागले तर तो आरसा कसा बनवायचा ? देवाच्या नावावर खोटेपणा, भोळ्या भावड्या लोकांना, फसवून देवाच्या नावावर पैसे कमवायचे, लोकांना मूर्खात काढायचं, देवळात, मशिदीत, मंदिरात, चर्चमध्ये सगळीकडे हा गोंधळ पाहिला की असं वाटतं की हा कुणाचा आरसा आहे बुआ ? हा काही परमेश्वराचा आरसा असू शकत नाही. कारण 'परमेश्वर हा एकच आहे' जरी त्याची अनेक नावे असली तरी त्याच एकच तत्व वाहात असतं आणि त्या तत्वावर वाढणारे लोक असे एक दुसऱ्याच्या विरोधात कसे बसले ? आणि एक दुसऱ्याला ओळखत सुध्दा नाही ? म्हणजे हा आरसा आहे कुणाचा ? हा आरसा परमेश्वराचा नव्हे, हा राक्षसाचा आरसा आहे. त्याच्यामध्ये व्सनं आली, काहीही सौंदर्य नाही, काहीही शोभा नाही, आपापसात कोणत्याही तऱ्हेची सुध्दा समजूत नाही. हे परमेश्वराचे साम्राज्य असू शकत नाही. हे कोणत्या तरी राक्षसाचंच आहे ! पण आता अंगापूरला आल्यावर वाटतं की, परमेश्वराचं साम्राज्य आलं वरं कां ! आणि एका तऱ्हेची तृप्ती वाटतं की सगळं गावच्या गाव आता सहजयोगात आला, सगळ्या विश्वाचा एकच धर्म आहे. तो आहे म्हणजे - 'परमेश्वराला प्राप्त करणे' आणि त्यानंतर त्या आत्म्यावर पूर्णपणे अवलंबून राहणे.

'तुम्ही आत्मा आहात' हाच धर्म आहे. बाकी सगळे धर्म खोटे आहेत. 'तुम्ही फक्त आत्मा आहात म्हणजे परमेश्वराचा आरसा आहात' बाकीच्या धर्माला तुम्ही कोणतेही नाव दिलं, हिंदु म्हणा, मुसलमान म्हणा, काहीही म्हणा तरीसुध्दा त्याचे जे तत्व आहे ते आहे की, असा मनुष्य जो आपल्याला धार्मीक बनवतो तो परमेश्वराचा आरसा झाला पाहिजे. पण तसं काही दिसत नाही.

आता नाशिकला गेलो होतो. तेथे सगळे उपटसुंभ बसलेले आहेत गोदावरीवर ! आणि मला म्हणायला लागले की, इथे कसले दुष्काळ पडतात ? इतकं आमचं इथ क्षेत्र असुन कसे दुष्काळ पडतात ?

त्याचं सरळ उदाहरण असं आहे, त्या ठिकाणी सगळ्यात जास्त तंबाखू की, जी राक्षशीण आहे. परमेश्वराला तंबाखू चालेल कां ? एक सरळ प्रश्न विचारायचा, आणि दारु, त्याशिवाय इतरही प्रकार इतके बोकाळलेत, त्या भागात की परमेश्वर तिथं काय पाऊस पडणार आहे. सगळीकडं दुष्काळ अशा लोकांच्यामुळे होतो.

घरात एक वाईट मनुष्य असला तरी साऱ्या घराचे राक्षस होतात. एका संत्र्याच्या पेटीत जर एक संत्र खराब असलं तर सगळी संत्री खराब होतात, 'चांगलं व्हायला वेळ लागतो' मी कुठं असं पाहिलं नाही की, एका संत्र्याच्या पेटीत जर शंभर चांगली संत्री असली तर आणि एक जर वाईट असलं तर एक ठिक होतो शंभरामुळे ! होत नाही ! त्याला उचलून काढून फेकावेच लागते.

जे लोक आपल्या आत्म्याला प्राप्त करून राहणार नाहीत ते समाजकंटक म्हणून राहतील, त्या लोकांच्यामुळे कधीही शुभ होणार नाही. तेव्हा अशुभ लोकांशी आपण संबंध दूर ठेवला पाहिजे. त्याला सांगितलं पाहिजे, तुम्ही शुचिर्भूत होऊन या म्हणजे स्वच्छ होऊन या.

लोकांना प्रेमानं सांगितलं पाहिजे, समजावलं पाहिजे, जितकी काही मेहनत करता येईल तितकी आपण अत्यंत हळूवारपणे केली पाहिजे हेही कबूल त्यावरही कुणी करत नसला, तर अशा माणसाला आपण दूर ठेवलं पाहिजे.

देवाच्या नावावर भूलथापा मारतो किंवा नुसतं मनोरंजनासाठी म्हणे आम्ही सप्ताह करतो ! सप्ताह म्हणजे बसला तिथं - पैसे खाणारा आणि सप्ताह चालू ! आहो ! तुम्ही गृहस्थातले लोक आहात ! मेहनत करून मुलाबाळांना पोसत आहात हे एक मोठं भारी यज्ञाचं कार्य करता. त्यावेळी या उपटसुंभांना पैसे द्यायला आणि ह्या सन्यासाला पैसे द्यायला तुम्ही कशाला आणायचं, अगोदर संन्यास घेतला तर स्वतःच कमवून खावं, गृहस्थाच्या नावावर हे का खात बसतात ?

तर अजूनही पुष्कळसे लोक सहजयोगात येऊनही अशा उपटसुंभांना बळी पडतात. मग त्यांनी त्यांना त्रास होतो.

परवा अशीच एक केस झाली, की एक सहजयोगी आले नी मला म्हणाले, माझी बायको फार आजारी आहे, काय करावं ? म्हटलं. असं का ! कुठं जातात त्या ? मग कळलं की, एक गुरुजी आहेत, ते काही सुटत नाहीत, तिचा मुलगा आजारी नी तीही आजारी आणि ते गुरुजी एक महाराज आहेत. घाणेरडे, फारच घाणेरडा मनुष्य आहे तो ! त्याच्याबद्दल फारच घाणेरड्या गोष्टी सांगितल्यात मला बायकांनी, पण ही बाई त्याच्या नादी लागली आहे. आणि तो मुलगाही आजारी आहे. ती काही त्याला सोडायला तयार नाही, म्हटलं आहो ! त्या गुरुंनी तुम्हाला काय दिलं ? मी एक आई म्हणून विचारते?

काही नाही ? मग तुम्ही काय दिले ? पैसे दिले ! फक्त ! असं का ? फक्त पैसे दिले त्यांना ! आणखी काय द्यायचं त्यांना ? अशा लोकांच्या नादी लागून आमचा भोळेपणाएका अर्थानी मूर्खपणा ठरतो.

तेव्हा जर सहजयोगात जर आलं तर सहजयोगातच बसलं पाहिजे, म्हणजे फक्त आत्म्यालाच मानलं पाहिजे, बाकी मूर्खासारखं वागायचं नाही.

होडीत बसल्यावर जर तुमचा एक पाय मगरीच्या तोंडात असल्यावर आम्ही कसा बचाव करणार ? तो पाय काढायला नको का मगरीच्या तोंडातून ? मगर आहे हे तुम्हाला समजणार तरी कसं ? जोवर तुम्ही बोटीत येणार नाही, तेव्हा थोडा वेळ खाऊ देत पाय, मग जा तुम्ही सगळेच्या सगळे.

तेव्हा एक सुज्ञ बुध्दीनं राहिलं पाहिजे, जशी तुम्ही शेती करता, शेती करतांना मनुष्याला फार सुज्ञ असावं लागतं, जे काही किडलेलं आहे ते काढून टाकतो आपण, जे चांगले बी बीयाणे असेल ते घालतो, त्याला खत पाणी घालतो, तसंच सहजयोगाचं आहे की, याच्यात जे काही किडलेलं आहे ते आपण काढून टाकलं पाहिजे व्यवस्थित, ते नको आम्हाला. जे चांगले आहे, व्यवस्थित आहे तेच आम्ही रोवून त्याच्यातून मोठेमोठे वृक्ष आम्ही करणार आहोत. संतांचा महिमाआणि त्यांनीवर्णिलेले आपले भविष्य हे आज दृष्टोत्पतीस येते.

मला फार आश्चर्य वाटले की, लंडनला एक पुस्तक वाचत असताना, एक ग्रीक म्हणून मोठा भारी कवी , त्यांनी आपल्या मिरवणुकीचे इतकं सुंदर वर्णन केलेलं आहे. तुम्हाला आश्चर्य वाटेल की, तुमच्या सगळ्यांचं वर्णन आहे.

ही एक आई आहे, आणि तीची ही मुले आहेत आणि ते आनंदाने बेहोष नाचत चालले आहेत. त्यांनी त्यांना आत्मसाक्षात्कार दिलेला आहे. इतकं स्पष्ट रुपानं वर्णन केलं आहे. आता मी ते आणलेलं नाही पण नंतर ते तुम्हाला आम्ही पाठवून देणार आहे.

अगदी तंतोतंत मिरवणूकीचं वर्णन दिलेलं आहे. आणखी परत तो असंही विचारतो, एक प्रश्न करतो व एक उत्तर देतो. की ही जी आई आहे, ती इतर आयांपासून मुलांना हिसकावून तर घेत नाही ? तर नाही, जर त्या आयाही तिच्या मुली आहेत आणि त्यांचे बापसुध्दा तिचीच मुलं आहेत.

फार सुंदर वर्णन मिरवणूकीचे आहे. कोठल्या तरी इंग्लंडमधील ५० वर्षापूर्वी एका माणसाने करून ठेवले आहे. इतकं की तुम्हाला फार आश्चर्य वाटेल.

आणि एक कवींनी केलंय, रविंद्र बाबूंनी फार सुंदर वर्णन केलंय. आपल्या देशात तर आहेतच पण दुसऱ्यादेशात सुध्दा आहेत. ह्या गोष्टी या द्रष्ट्यांनी पाहिल्या होत्या. हे मोठे मोठे जुने द्रष्टे. त्यांनी हे लिहून ठेवलंय. आपल्या मुलां बाळांसाठी, आज ती मुलंबाळं इथे बसली आहेत आणि त्यांना हे दृष्टोत्पत्तीस येतंय. आनंदी-आनंद सगळीकडे, प्रेमाच्या ओघात सगळेवाहून गेलेले, आता हे विचारे ! जे बाहेरून आलेत ! १४ देशातुन लोक आलेत. काल रात्री आम्ही ४ वाजता झोपलो कारण की काल रात्री ख्रिसमसची रात्र होती. सकाळी ६ वाजता उठले. नंतर आघोळी-बिंघोळी करून जेऊन-बीऊन निघाले. एक प्रश्न उभा राहिला. त्यामुळे त्यांना पुण्याला जावे लागले. त्यांना यायला वेळ झाला. संबंध वेळ हे प्रवासात होते. आल्यावर परत जसेच्या तसे कुठून, कुठून आलेत ! हजारो मैलावरून ! तुमच्या आईचा महिमा गाण्यासाठी. या तुमच्या अंगापुरच्या मातीवर लोळून राहिलेत. काहीतरी विशेष या मातीचंही असलं पाहिजे. आणि तुमचंही महत्व असायला पाहिजे. तेव्हा याआनंदाच्या शुभ प्रसंगी मी सर्वांना अनंत आशिर्वाद देते.

आणि सहजयोग संबंध सातारा जिल्ह्यात पसरला पाहिजे. संबंध सातारा जिल्हा निनादला पाहिजे कारण ही भूमी श्री रामदासांची आहे हे फार मोठे संत साधू झालेले आहेत. अहमदनगर जिल्ह्यामध्ये नाथांची भूमी असल्याने पुष्कळ कार्य झालेले आहे. तसेच सातारा जिल्हह्यात सुध्दा झालं पाहिजे. वेगवेगळ्या ठिकाणी सहजयोगात व्यवस्थित लोक जमले पाहिजेत आणि जमल्यानंतर असं समजलं पाहिजे की सहजयोगची तत्वं काय आहेत. आणि ती तत्वं अंगी आपल्या मध्यू आहेत किंवा नाहीत ते तोलून पाहिले पाहिजे.

ही तत्वे आपल्यामध्ये आहेत की नाहीत कारण हा विश्वधर्म आहे. हा कोणत्याही धर्माचा अपमान करीत नाही पण ते धर्म असायला पाहिजेत. अधर्मी लोक जर आपणाला धार्मिक मानतील तर ते आम्ही मानत नाहीत, जे सत्य असेल तेच आम्ही मानतो.

असो जे इथले गुरुजन आहेत. सहजयोगामधले ज्यांनी पुष्कळ वाचन, पठण करून ठेवले पाहिजे, कारण उद्या तुमचा सामना अशा लोकांशी होणार आहे, जे कर्मठ आहेत, त्यांनी पुष्कळ पुस्तेकं वाचलेली आहेत आणि जे फार विद्वान आहेत आणि स्वतःला फार अतीशहाणे समजतात. अर्थात तुमची आई

तुमच्या पाठीशी आहेच.

तरीसुध्दा त्यांच्याशी बोलताना तल्लख बुध्दी आणि इतकी छाप असायला पाहिजे की कोणताही प्रश्न टाकला तरी त्याला बरोबर आम्ही निरुपण करुन उभे करु शकतो. ही स्थिती असल्याशिवाय ह्या कर्मठ लोकांना जिंकणं सोपं काम नाहीय.

ज्यांच्यासमोर आदिशंकराचार्यानीसुध्दा हात टेकले की या महामुर्खांशी आणि आंधळ्यांशी कोण बोलत बसणार. आणि शेवटी त्यांनी मग सौंदर्यलहरी म्हणून एक पुस्तक लिहून टाकलं. त्याच्यात नुसतं आईचं वर्णन लिहित बसले तरी लोकांनी म्हटले आहे ! एवढे मोठे तुम्ही वेदशास्त्र निपुण गृहस्थ आहात. गृहस्थ नव्हते म्हणा, संन्याशीपण एवढे मोठे आहात तुम्ही वेदशास्त्र निपुण. त्यातल्या त्यात तुम्ही इतके मोठाले, विवेक चुडामणीसारखी पुस्तके लिहिली त्याच्यावर हे आईचं वर्णन लिहिण्याची तुम्हाला काय गरज पडली ? सौंदर्यलहरी आईचं सगळं वर्णन तुम्ही नखशिखांत, सगळं काही आईचं पर्णन केलं. ते म्हणाले, फक्त हे बघा, बाकी सगळं एकीकडे राहिले ते काहीतरी बेकार आहे, जे काही खरं आहे ते हे आहे, हे लोकांना सांगतो कारण त्या बेकार ह्याच्यात पडलं की वाद विवाद सुरु झाले. तेव्हा तुम्हीसुध्दा सर्वांनी त्यांनी आईचं वर्णन केलेले ऐकावं, वाचावं, श्रवण करावं.

पूर्वी गोष्ट अशी आहे की, सहजयोग्यामध्ये जी आपली स्थिती असते ती खरोखर क्षणभंगूर असते. क्षणाला एक मिनीट दिसते, न दिसते, परत दिसते, परत नाही. लोकांना असे वाटते की, हे काय एकदा आमची कुंडलिनी जागृत झाली, आम्ही योगीजन होतो, तसं नाही. थोडासा प्रकाश येतो तुमच्यात. त्या प्रकाशात तुम्ही स्वतःचे दोष बघू शकता. एकदम तुम्ही फार मोठे योगी होत नाही. जी क्षणभंगूर प्रवृत्तीला नीट करण्यासाठी तुम्हाला आपले चित्त थाऱ्यावर आणावे लागते. त्यासाठी तुम्हाला बैठक असल्याशिवाय सहजयोग जमू शकत नाही.

दोन गोष्टी सहजयोगात आहेत एक आहे बैठक. बैठक असते ती पाण्याची. ट्रीटमेंट वगैरे प्राप्त झालेली किंवा ध्यान करणे, फोटोवरती, दुसरी फारच महत्वाची गोष्ट आहे की, 'हे कार्य सामुहीक आहे'.

कोणी जाऊन हिमालयावर बसून म्हणेल की, माताजी मी तुमचा फोटो घेऊन गेलो होतो. आणि मी फार ध्यान केलं, आमचा त्याच्याशी काहीही संबंध नाही. 'ही एक सामुहिक कार्यप्रणाली आहे', म्हणजे कार्य करण्याची पध्दत आहे.

एकुलती एक कुणी बाई, बसून म्हणेल, मी इतकं, माताजी तुमच्यासाठी केलं, त्यानं काही होणार नाही, माझ्यासाठी काही करु नका, स्वतःसाठी करा.

सगळ्यांच्या बरोबर मिळून हे कार्य झालं पाहिजे. आता घरगुती उदाहरणांनी तुम्हाला समजेल याचा काय अर्थ आहे. आपल्या घरामध्ये आपण दही लावतो. आपण लोणी काढण्यासाठी त्याला मंथून घेतो. मंथताना तुम्ही पाहिले असेल मडक्यात पुष्कळसे असे लहान लहान कण असे असतात त्या लोण्याचे, की जे इकडे तिकडे चिकटून राहतात. त्यावेळी आपण एक लहानसा गोळा पाण्यावर काढतो व ताकात घालतो, त्या गोळ्याला आपण मंथू लागतो, तेव्हा त्या गोळ्याला लहान लहान कण चिकटतात, पण जे चिकटत नाहीत त्यांना आपण ताकच म्हणतो. लोण्याबरोबर उचलून घेत नाही. तेव्हा जे त्या सामुहिकतेला चिकटले ते सहजयोगी, त्यांना आम्ही ओळखतो व जे चिकटजे नाहीत त्यांना आम्ही ओळखत नाही.

ही सामुहिकता आपण साधली पाहिजे. त्यात वादविवाद, भाऊबंदकी किंवा भांडणं करणं वगैरे हे सहजयोगात बिलकुल शोभत नाही. या प्रेमाच्या साम्राज्यात, आनंदाच्यासोहळ्यामध्ये कसली भांडणं आणि कसला काय वादविवाद, आनंद घ्यायला सुध्दा आता वेळ राहिला नाही अशी परिस्थिती आहे तेव्हां भांडणाला कुणाला वेळ आहे ?

असो, आज फार आनंदाची वेळ आहे. सगळं आनंदात आहेत. इतका उशीर यांना झाला तरी पर्वा नाही हे अगदी मजेत बसलेत तुमच्च्यावरोबर. हे तुमची मजा बघायला लागले. ते तुमची मजा घ्यायला. त्यांना जर विचारले तर हे लोक किती मजेदार आहेत आणि तुम्ही म्हणता हे लोक किती छान आहेत म्हणजे ह्यांना तुमची मजा येऊन राहिली आहे. आणि तुम्हाला त्यांची मजा येऊन राहिली आहे. अशा तऱ्हेने आपापसातील जी जुगलबंदी म्हणतात. हे आपापसातील परस्पर प्रेम आहे. हे बघून एका आईच्या हृदयासाठी फार मोठं मोठं कार्य आहे.

मला समजत नव्हतं की, कसं आवरुन धरावं, इतकं गहिवरुन आलं होतं.

तेव्हा परमेश्वर तुम्हा सर्वांना असंच प्रेम देवो, आपापसात तुम्ही सगळे प्रेमानी रहा आणि सुखानी रहा आणि आनंदाच्या सागरात पोहत रहा असाच माझा सगळ्यांना आशिर्वाद आहे.

# आत्म्याचा प्रकाश

## (१८-२-१९७८) (भाषणाचा सारांश)

आत्म्याबद्दल सांगितलेच आहे. त्याच्या स्वरूपाबद्दल आज सांगेन. आत्म्याच्या स्वरूपाची चित् आणि आनंद अशी त्याची व्याख्या करतात. परमेश्वरात सत् चित्त आणि आनंद आहे. आणि आत्मा हा परमेश्वराच्या प्रतिबिंबात असतो. कारण हे त्याचे प्रतिबिंब आहे. पण तेही सत् चित्, आनंदात झाले पाहिजे. आता आपण चित्त बघू या.

चित्त म्हणजे काय? चित्त कुठे असतं? चित्ताचे स्थान कुठे? आणि चित्त जे इकडे तिकडे जातं ते कसं जातं? तर चित्त सगळीकडे असते असे म्हटले पाहिजे. चित्त कुठेही जाऊ शकते. तुम्ही आता बसल्या बसल्या म्हणाल कि, आमचं चित्त लंडनला जाऊ दे. तर तुमचं चित्त जाऊ शकतं. तुम्ही म्हणाल कि, आम्ही आता स्वर्गात जातो. तर स्वर्गाकडे सुद्धा तुमचं चित्त जाऊ शकतं. म्हणजे तुमचा विचार जाऊ शकतो. तुम्हाला जर आपल्या मुलाचा कि मुलीचा विचार असला तरी सुद्धा तुम्हाला चित्त घालता येतं. म्हणजे तुम्ही नुसता असा विचार करायचा कि आता माझी मुलगी काय करीत असेल बरे? कि लागलेच चित्त तिकडे! म्हणजे काय? कि चित्त हे एखाद्या सागरा सारखं सगळीकडे पसरलेलं आहे. ज्या किनाऱ्यावरती तुम्हाला जायचं असेल त्या किनाऱ्यावरती ते आपली नाव घेऊन जाऊ शकते त्याला काही बंधन नाही. जिथे मिळेल तिथे तुमची नाव त्या चित्तावर बसून जाऊ शक ते. महह्जेच चित्ताच्या लहरींवर बसून तुम्ही वाटेल तिकडे जाऊ शकता. पण हे चित्त आतमध्ये जाऊ शकत नाही. म्म्हणजे जर आपल्याला बाहेरचा विचार करायचा असेल तर आपण करू शकतो. पण असा विचार कराचा असला कि, आपल्या शरिरात काय आहे? आपण कोण आहोत? कारण चित्त आणि आत्मा ह्या दोन गोष्टी विभिन्न झालेल्या आहेत. मानव स्थितीमध्ये चित्ताला त्यापासून दुर केलेलं आहे. आणि त्यामुळे त्या चित्तांनी आपण आत्म्याकडे जाऊ शकत नाही.

जसे भरून घेतलेलं पेट्रोल समजा, इथे ठेवलेलं आहे. ते पेट्रोल सगळीकडे सांडू शकतं. वाटेल तिकडे पसरू शकतं. पण मोटारीच्या मशिन मध्ये म्हणजे कार्बोरेटर मध्ये ते जायला पाहिजे. त्याप्रमाणे चित्त सुद्धा जो पर्यंत आपल्या 'कार्बोरेटर' मध्ये जात नाही, तोपर्यंत आत्म्याची भेट होऊ शकत नाही. मानवाचे बाहेर आलेलं चित्त आतमध्ये कसे, घालायचे ? हा प्रश्न मानवाला आहे. जे चित्त सागरासारखे सगळीकडे पसरू शकते. ते चित्त कुठ घालायचं? कसं घालायचं ? ते सगळं आपल्याला समजत आहे. पण ते आत्म्यापर्यंत आपण नेऊ शकत नाही. हा एक मोठा प्रश्न सुरवातीपासून मानवाला आहे. आपण मोटारीमधील पेट्रोल स्वतः विचार करून, काही मेहनत करून जर कार्बोरेटर मध्ये पोचवू शकत नाही. तसेच मानवाचे आहे. त्या बाबतीत मनुष्य हताश होतो. म्हणजे असे कि तो स्वतः उचलून काही कार्य करू शकत नाही. फक्त स्वतःचे चित्त मात्र त्याला ह्या महान कार्यासाठी अलिप्त ठेवावे लागते.

म्हणजे ज्या माणसाचे चित्त जास्त तमोगुणामध्ये लपेटलेलं आहे. तो तमोगुणी कामे करतो. किंवा त्याचे चित्त रजोगुणामध्ये फार आहे. त्या माणसाचे चित्त परमेश्वरामध्ये जाण्यासाठी रिकामे नाही. हे सगळं बरोबर आहे. कारण (very busy person) त्याला आत्म्याकडे उतरण्यासाठी वेळ नाही. त्याला जगभर दुसऱ्या उचापती आहेत. कारण त्याचे ते चित्त आत्म्यासाठी नाही. पण सत्त्वगुणी जी माणसे असतात; सत्त्वगुणी म्हणजे जी धर्मामध्ये उभी असतात. ती माणसे म्हणजे मोठी धार्मिक, वितंडवाद किंवा कर्मकांड वगैरे करीत नसतात.

धर्म म्हणजे साधारणपणे मधोमध रहाणे. समानत्व ठेवणे. प्रत्येक गोष्टीमध्ये समान बुद्धीने बघणे. म्हणजे आता रागवायचे नाही. तसे नाही. रागवले पाहिजे. पण रागावणे हे स्वतःच्या हितासाठी आणि लोकांच्या हितासाठी असल तर अत्यंत उत्तम असतं. अगदी फारच शुंभासारखं बसायला नको. काही पुष्कळ लोकांना असं वाटतं की, आम्ही ऐवढे मार खाल्ले. मी फार अगदी दुःख भोगले कशाला? कुणी सांगितलं होत तुम्हाला? तसही करणं काही शाहणपणाचे लक्षण नाही. तेही एक वैगुण्य आहे. दुसऱ्यावर आक्रमण करणे हे रजोगुणी आहे. पण मधोमध उभे राहून बघणे आणि मधोमध त्या गोष्टींचा वेध घेऊन विवेक बुद्धीने पहाणे हे सत्त्वगुणी वागणं आहे. हे सांगायला कठीण दिसतं, पण करणे फार सोपे आहे सर्वात सोपे सत्त्वगुणी होणे. पण माणसाला काही सांगितले कि 'सोपं कर कि ते नको.' काहीतरी विशेष पराक्रम पाहिजे ना !

आणि पराक्रम करण्यासाठी कितीतरी मेहनत, सरळ जेवायचं म्हटलं कि, तसं कशाला? पण आम्ही असंच जेऊ शकतो. कोणी सांगितलं होत सर्कशी करायला? आता सर्कशीतल्या लोकांना बघितलं, कि, मला आश्चर्य वाटतं. कोणी सांगितलं होतं ह्यांना डोक्यावर उभे रहायला ? आणि एवढे तमाशे करायला? त्या तारेवर चालतात आणि त्यामुळे त्यांच्या चक्रावरती आघात येतो. काही लोक म्हणे हिमालयावर चढले. काय काय वेडेपणा एकेक? कोणता एक सांगावा का? अनेक आहेत. सर्कशीतले लोक बघा. उड्या काय मारतील ? कोलांट्या काय मारतील? नाहीतर बायकांचे असे पाय काय धरतील?

मी तिकडे एक डान्स पाहिला. तो म्हणजे आर्टिस्टिक डान्स, कि दोन पायांच्या चवड्यावर उभे राहून करायचा. अरे ! सरळ करा. तसं पायावर उभं राहिलं कि तुमचं नाभी आणि विशुद्धी चक्र दोन्ही कामातून जाणार पण काही तरी उलटेपणा करायचा. माणसाचं हे असे आहे. माणसाला भैताड आहे. भैताड म्हणजे असं कि, साधे आहे ते घ्यायचे

नाही. आणि काही तरी उलटे पणा करायचा. कोणी सांगितले होते दोन पायांच्या चवड्यावर उभे राहून डान्स करायला ? साधे जसे पाय आहे त्यांनी डान्स करता येत नाही कां तुम्हाला ? पण तसं दोन पाया वरतीच फिरायचं. सगळी कामे करायची आणि जो सर्वात जास्त कामे करील तो सर्वात मोठा बहाद्दुर. त्यांनी काय ते असं करून ठेवलय सगळं. स्वतःची चक्रे खराब करून घ्यायची, आणि म्हणायचं कि आम्ही एवढं करतो. आणि आम्हाला पार नाही कां करत माताजी!

कोणत्याही गोष्टीचा अतिपणा करणारे लोक ते सहजयोगाला जरा कमी पडतात, साधारण मध्यम प्रवृत्तींनी राहिलं पाहिजे. प्रत्येक गोष्टीकडे समतत्व ठेऊन रहाणं तरी सुध्दा पुढे पुढे काही तरी करूनच दाखवायचं कि, आम्हाला अगदी जे जमेल तेवढं करून दाखवू इथपर्यंत ठिक आहे. तेव्हा अशा प्रवृत्तींने रहाणारे लोक त्यांचे चित्त जे आहे, ते एवढं बाहेर जात नाही. आता तुम्ही समजा एखादा पहेलवान आणला, आणि म्हणाला श्री माताजी ! तुम्ही ह्याला पार करा. हे शक्य नाही हो. पहेलवान म्हणजे केवढा 'इम् बॅलेन्स' (असमतोल) आला. नुसता फिजिकली (शारिरीक) डेव्हलप माणूस असला कि डाव्या बाजूला त्याला असमतोल्व आलेलं आहे. एक तर त्याला मधुमेह (डायबेटिस) असणार किंवा डोके खराब असणार. डोकं खराब नसलं तर अगदी जाड मनुष्य असणार. काही तरी असलंच पाहिजे. बरं हा एक असमतोलत्वाचा प्रकार झाला. दुसरे असमतोलत्व बुद्धीचे. म्हणजे वाचन, व्यासंग म्हणजे अभ्यासाला लागले की पुस्तकं कोळवून प्यायची त्यांनी इतकं असमतोलत्व माणसाला येतं कि या असमतोलत्वाला (इम् बॅलन्सला) पारावार रहातो का ?

म्हणजे एकीकडे हे चित्त चाललं ओढत ओढत. तुम्ही असा विचार करा कि, चित्त हे असं पसरलेलं आहे. ते असं ओढत चाललं एकीकडे. आता बाकीकडून ओढत ओढत ते निघालं शेपटासारखं आणि चाललं. मग सरळ इकडून चित्त निघालेलं तिकडे जर चिकटलं, आणि जर का ते अशा रितीने निघाले कि इकडे काहीच राहिलं नाही. तर मग इकडे आणायचं तरी कसं चित्त ! सबंध शरिरात सगळीकडे तुमचं ते चित्त पसरलेलं आहे. आणि हे चित्त आपण जे आणलं ते सेंट्रल नर्व्हस सिस्टममध्ये परसलेले आहे, आणि प्रत्येक शरिरात ते आहे. प्रत्येक ठिकाणी ते आहे.

तर तुम्ही मात्र हे चित्त स्वतःमध्ये 'आंत' करू शकत नाही. ते तिथे तुमचं चित्त असतं जर तुमचं काही दुखलं तर तुमचं चित्त तिथे जाईल. हे पहा माझं इथे दुखतंय, असं तुम्ही सांगाल, पण आपल्यात काही घडत असलं तर ते तुम्हाला कळायचं नाही. दुखल्यावर कळेल. कारण जेव्हा नर्व्हस सिस्टिमला दुःख होईल, तेव्हा कळेल कि इथे त्रास होतो. तेव्हा अशा अतिशय लोकांना जर मी म्हटलं की, या तुमच्या शक्ति मधोमध आणा तर ते त्यांना पटत नाही. कारण मध्यम स्थितीतले लोक, मध्यम विचाराचे लोक मध्यम परिस्थितीतले लोक सहजयोगाला उत्तम आहेत.

फार यशस्वी जे लोक आहेत. त्यांचं व आपलं काही जमायचं नाही. तेव्हा ते यशस्वी, जेव्हा त्यांनी गळ्यात माहा घालून गाढवावर बसवे. कारण त्यांची यशस्वीपणामुळे डोकी खराब असतील. आम्हाला या सत्ता मिळाल्या. त्या सत्ता मिळाल्या, आम्हाला ज्या सत्ता मिळाल्या त्या कुठे टाकायच्या आम्ही. तेव्हा असे प्रकार घडतात. तर त्यांची डोकीच वाईट आहेत अशा लोकांना जर काही सांगितलं. तर त्यांच्या लक्षात येणार नाही. कारण त्याचं चित्तच मुळी शेपटासारखं निघून गेलेलं. आता त्याच्यात समतालेत्व (बॅलन्स) येण्यासाठी काही राहिलंच नाही, आणि त्यांना मुळीच समजत नाही, कि आमचं डोक एवढे खराब झालेलं आहे. अर्थात एवढा अहंकार आलेला आहे कि, या अहंकारामुळे आम्हाला काही समजतंच नाही, दिसत नाही कि आमचं काय चुकलंय? किंवा आमचे वाईट काय झालंय? आम्ही आपले वहातच चाललो आहोत. अशा एकांगी स्थितीच्या माणसाला सहजयोग नाही झेपणार. एकांगीपणाने रहाणाऱ्या लोकांना सहजयोग झेपत नाही. त्याच कारण असं कि त्यांचं चित्तच मुळी समतोलत्वात नाही. पहिल्यांदा आपले चित्त समतोलत्वात आणले पाहिजे. आहे का? बघा बरे !

आता कसं कळणार, सहजयोग्याला लगेच समजतं दोनही हातामध्ये बरोबर (चैतन्य) आलं पाहिजे. आधी चित्ताचे समतोलत्व पहा. चित्त समतोलत्वात आणल्या शिवाय काहीही होणार नाही तर तुमचे उघडणार कसे सहस्त्रार ? साधा हिशोब आहे आधी स्वतःच्या आयुष्यात समतोलत्व आणा.

आता एखाद्याला आम्ही म्हणजे पहाटे चार म्हणजे चारला उठणार. अहो तसं करायचं नाही. उठवते मी तुम्हाला. उठले आपले सहज, पण चार म्हणजे चार. मग साऱ्या घरातल्या लोकाना उठवायचं. त्यांना त्रास द्यायचा. तसे काही नको. आलं मनात, उठले सहज. चिमण्या उठतात तसे. आरामात ध्यानाला बसले. मनात आले, 'आमचं असं आणि आमचं तसं आहे.' अशी म्हणणारी मंडळी कामातुन गेली. आमचं अस्सं नी तस्सं. तुमचं काय आहे? आम्ही म्हणजे असे. तुम्ही म्हणजे कसे ते कळलं, मनात मधोमध विचार ठेवून चाललं पाहिजे.

मला असे पुष्कळ वेडे जगात भेटले. आणि सरळ बोलतात. त्यांना काही लाजा वाटत नाहीत. 'आमचे असे आहे हो माताजी! मला हे चालतंच नाही." असे तुम्हाला सामान्यतः बरेच लोक दिसतील जगामध्ये. 'चालत नाही' म्हणजे काय? तर असे बाष्फळ लोक सहज योगाला बेकार आहे. कारण त्यांचं काय झालंय? संबंध गळून पडलाय. त्याचं कारण त्याचं चित्त वाहून गेलं आहे आणि त्यांच्यात मोठा दुरावा झालेला आहे. तेव्हा चित्ताला 'समतोलत्वात' ठेवलं पाहिजे.

चित्ताचे समोलत्व झाले कि, 'रिअलायझेशनच्या वेळेला काय होतं? कारण कुंडलिनी ही चित्ताला चेतवते. त्यामुळे त्याच्यात प्रकाश येतो. म्हणजेच ती चित्तात प्रकाश स्थापते. किंवा असं म्हणा कि चित्तामध्ये नियमितपणा येतो. किंवा तिचे आकर्षण होते. ती आपल्याकडे चित्ताला ओढून घेते. जे सबंध ओढून घेतलें चित्त तिच्याकडे आहे. जे इकडे तिकडे धावलेलं होतं. ते सबंध तिच्याकडे धाव घेतं. आणि मग जेव्हा आत्म्याकडं तिचं स्थान येते. हे आत्म्याचे स्थान हृदय आहे व सदाशिवाचे स्थान सहस्त्रार आहे. कारण स्थान जरी ते सहस्त्रार असले तरीपण त्याचं स्थान हृदयावर असतं.

जसं (परम) आत्मा नेहमी शरीराच्या बाहेर असतो. तो थोडासा डोक्यावर असतो. पण त्याचं स्थान हृदयामध्ये असतं. म्हणजे असा एक गव्हर्नर आहे. त्याचे रहायचं स्थान एक असते आणि काम करण्याचे स्थान दुसरे असते. तसे इथे डोक्यावरती सहस्त्रावर सदाशिवाचे

स्थान आहे. जेव्हा कुंडलिनी त्याच्या चरणावरती येते. तेव्हा लगेच हृदयावरती सुद्धा ही कुंडलिनी वर (सहस्त्रावर) आली आहे. अशी जाणीव होते. तसेच कुंडलिनीवर वर्षाव होतो. त्याच्यावरून आत्म्याचा प्रकाश ओळखता येतो. तो प्रकाश ओळखल्या बरोबर हे जे चित्त आहे हे माणसाचे चित्त आहे. त्याच्यामध्ये प्रकाश येतो. म्हणजे नेमकं कुठे? तर तुमच्या सेंट्रल नव्हर्स सिस्टिममध्ये प्रकाश येतो कळलं कां? म्हणजे तुमच्या चेतनला एक नवीन आयाम किंवा एक नवीन डायमेनूशन मिळते. नवी दिशा मिळते. सत्य काय ते जाणता येतं आणि त्याची प्रचिती येते. प्रचिती येणे हेच 'सत्य' होय. बाकी सगळं असत्य आहे. मी तुम्हाला कितीही म्हटलं कि राम हा आणि सीता ती आणि अमूक नी तमूक. तुलसी रामायण वाचून दाखवलं. कुराण झालं नी बायबल झाल हे सगळं जे आहे ते खरं आणि त्याची प्रचिती आता येते म्हणजे ही प्रचिती खरी आहे कि नाही, वाचलेलं खरं आहे कि नाही, हे जाणण्याची शक्ति तुमच्या चित्तात येते. कळलं कां? आता पर्यंत तुमच्या चित्ताला कोणतीही गोष्ट पक्की आहे किंवा नाही हे माहित नाही. परमेश्वर आहे का? असेल बुवा ! आमच्या आजीबाई म्हणाल्या होत्या नाही तर नाही. पण आहे का? नक्की माहीत नाही. काहीच नक्की माहित नसतं. पण एकदा मात्र तुम्ही पार झाले आणि तुमच्या हातातून चैतन्य लहरी (व्हायब्रेशन्स) सुरु झाल्या कि लगेच तुम्हाला कळतं, कि ही गोष्ट खरी आहे? कि खोटी आहे? आता असे हात पुढं करून विचारा, 'हां! आहे का परमेश्वर? असा प्रश्न विचारा मनात मग बघा कशा चैतन्य लहरी सुरु होतात त्या म्हणजे सत्याची प्रचित येते. सबंध Absolute सत्य काय आहे ? ते उभं रहातं असत्य रहात नाही. कोणतीही गोष्ट संदिग्ध रहात नाही. तुमचं काय (चक्र) धरलं (कॅच) आहे ते तुम्हाला समजतं. समोर ह्या बाई आहेत, ह्याच काय (चक्र) धरलेलं आहे? त्यांना काय त्रास आहे? मग डॉक्टरकडे जा. तपासणी (Dyagnosis) करा मग हे असेल नाही तर ते असेल. मग तिला परत चरकांत घालून काढायच. काहींनी कान नाही तर तिचे दांत काढायचे, डोळे काढायचे. मग त्या बाईंची परिस्थिती अगदी गंभीर आहे. असं सांगायचं. डॉक्टरांचे हे असंच आहे पैसे वगैरे घेऊन मोकळे परत दात ही गेले नी डोळेही गेले. नी कानही गेले. तेव्हा असले प्रकार सहजयोगात नाहीत. दुसऱ्या माणसाला काय त्रास आहे? हे हातावरती असं पटकन समजतं. त्याची प्रचिती येते व सत्य हे जाणता येतं ह्या क्षणाला काय सत्य आहे? हे माहित आहे.

आता हे समोर उभे आहेत ह्यांना काय झालेलं आहे हे माहित आहे? काय तुम्हाला माहित आहे ना? 'हो. 'मणीपूर आज्ञा आहे.' बरोबर आहे, सगळ्यांना कुठे काय (चक्र) धरलेलं आहे? हे माहित आहे. तसेच दुसऱ्याचे काय (चक्र) धरलेलं आहे? हे समजतं आणि दुसरं असे कि हे आमचं (चक्र) धरलेलं आहे. आम्ही धरलेले नाही आहोत. तेव्हा तसं काही वाटत नाही (चक्र) धरलेलं आहे म्हणून सांगितलं कि झालं. दुसऱ्या कुणाला सांगितलं कि तुझं (चक्र) धरलेलं आहे. तर तो मारायला धावायचा. कारण सहज योग्याला कळतं कि हे (चक्र) धरलेलं आहे. ते माताजींना सांगायचं कि हे काढा म्हणून दुसरं असं कि हे (Identifyed) असतं. पण सहज योग्याला माहित असतं, कि हे जे श्री माताजी म्हणतात ते सत्यच आहे मुळी. हे काढून घ्यायचं एकदाचं. कुणाला त्याच वाईट वाटत नाही. सुरवातीला वाटायचं म्हणा; थोडे बहुत जर मी म्हटलं (चक्र) धरलेलं आहे, तर सगळे बसकन ओरडायला यायचे का? मला (चक्र) धरलं म्हणता ? तुमचंच (चक्र) धरलेलं आहे. अशी एकेकाळी स्थिती होती. आता तसा प्रकार नाही आता बरं आहे.

आता सगळ्यांना कळतं कि चक्र धरलं म्हणजे काय? आपल्याला धरलेलं नाही, चित्तात जे काही घाणेरडं आहे ते गेलं पाहिजे. तर आपल्या समोर जे काही सत्य आहे. ते तुम्हाला सांगते, खोटं सांगत नाही. आता सत्याचा प्रकाश सुरु झाला. तुम्ही काहीही प्रश्न विचारा, आमच्याबद्दल विचारा, कि, आमच्या समोर ही आलेली 'बाई' थोतांड आहे काय? आमच्या विरूद्ध काय जगात गोष्टी केल्या? म्हणजे खरं असताना म्हटलं काय. तर ह्या आंधळ्या लोकांना रागवायचं तरी कशाला? त्यांना दिसतच नाही. खड्ड्यातच हे जाणार. त्यांना म्हटलं कि मग बघू या. मग डोळे निट झाल्यावर त्यांना दिसतं. सत्य काय आहे! माताजी जे काय सांगतात ते खरं आहे? कि खोटं आहे? एकदा दिसलं कि मग ठिक होतं. प्रचिती येते. पण डोळेच नसले तर त्याच्याशी वाद घालून तरी काय करायचं? म्हणून मी तुम्हाला सांगते कि वादू नका भांडू नका. वाद घालून काही होणार नाही.

कारण सत्याची प्रचिती ही आत्म्यामुळेच होते. दुसरं कुठूनही जाणलं जाणार नाही. सत्य म्हणजे काय ? की, जे (Absolute Truth) पूर्ण सत्य आहे. कोणच्याही बाबतीत. ते आत्म्याकडून जाणता येतं. मग ते येशू कसे होते ? वगैरे सगळं हृदयाकडून जाणतां येतं. जगातली कोणतीही गोष्ट असो.

ते सर्व आत्म्याकडूनच जाणलं जातं. आता तसं म्हटलं तर मला राजकारण समजत नाही. म्हणजे मानवाचे समजत नाही. पण सगळं समजतं. ह्याचा अर्थ असा कि, जे आत्म्याचे ज्ञाने खरे (Absolute) आहे. तेवढंच मला माहिती आहे. पण जे भ्रामक आहे ते मला माहित नाही. आणि तिकडे माझे लक्षही नाही. आणि मला ते सांगायचंही नाही. तुमचंही लक्ष तिकडे नसावं. तेव्हा सहजयोगात पार झाल्यावर तुमच्यात नवीन दृष्टि आली. आत्म्याच्या प्रकाशामुळे तुम्हाला सत्याची प्रचिती येते. सत्याला तुम्ही जाणता आणि सत्यात तुम्ही उभे आहात. सत्य तुमच्या हातातून वहात आहे.

तेव्हा चित्त हे परमेश्वर स्वरुप आहे. म्हणजे चित्ताने तुम्हाला समजलं की, परमेश्वराचे चत्त असे असते. उदा. आम्ही इथे बसलो आहोत. आता तुम्ही आम्हाला काही गोष्टी सांगितल्या. त्यातील गोष्ट आमच्या नजरेत आहे. लगेच तिकडे कार्य सुरु झालं. तेव्हा फक्त थोडी आमची माया असते. नी ईच्छा असते. मला असं म्हणायचं आहे की, तसं चित्त तुमचं अजून नाही. एवढं चित्त मात्र आहे. पण जर तुम्ही मनोभावे म्हटलं की, माताजी! माझं एवढं तुम्ही काम करा. तर होणार.

म्हणजे असं की, तुम्ही माझ्याजवळ तितके असायला पाहिजे. पण हो तं काय ? पण तुम्ही म्हणजे सहजयोगामध्ये अगदी विरळ. आणि मग म्हणायचं की आम्ही माताजींना म्हटलं होतं. आणि माताजींनी आमचं काहीच केलं नाही. असं कां ? म्हणजे माझ्यावर अधिकार जोडायचूच्या आधी हा विचार केला पाहिजे की, आम्ही स्वतःवर किती अधिकार केला आहे. म्हणजे असं की, "आम्ही रेसकोर्सला गेलो होतो.

तिकडे आम्हाला घोडा दिसला. म्हटलं माताजी आमचा घोडा पहिला येऊ दे". माझं आणि घोड्याचं अगदी वाकडं आहे.तुमचा घोडा कधीच येणार नाही.उलट तुम्ही चांगलेच हराल.नाहीतर सट्ट्यावर पैसे लावायचे. मला तर कधी सट्टा समजलाच नाही.सट्ट्यावर पैसे लावले होते आणि माताजींनी आम्हाला बुडतील घातलं.होणारच ! इतकेच काय ? पण चांगलेच डुबणार.पैसे लावून जर सट्टा खेळले तर असा बसेल फटका कि बस्स ! माझं नांव घेऊन ह्या सगळ्या गोष्टी करायच्या नाहीत.ही गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे.

तेव्हा जे सत्य स्वरुप आपल्यामध्ये आहे.आणि जो आपल्यामध्ये नेहमी वास करतो त्या परमेश्वराला जाणल्यानंतर त्याच्यापासून सत्याची उत्पत्ती झाल्यावर आणि सत्य तुमच्या हातातून वहात असताना आणि तुम्ही ते जाणलं असताना , तसेच त्या सत्यानी तुम्ही दुसऱ्याची सुध्दा पूर्णपणे ओळख करून घेत आहात , इतकच नव्हे तर सर्व संसाराची तुम्ही ओळख करून घेत आहात , तेव्हा ते सत्य आणि चित्त एक झालं कि झालं. तुम्ही बघा सत्य आणि चित्तात काहीच अंतर नाही. तुमचं चित्त हेच सत्य झाल्यावर तुम्ही कोणताही प्रश्नश्न विचारला तर त्याचे उत्तर तुमच्या चित्ताकडून आहेच.

तेव्हा सत्य आणि चित्तात अंतर केव्हा होतं ? जेव्हा तुम्ही उगीचच विचारकरीत बसता. जेव्हा तुम्हाला असा प्रश्न पडेल की , हे सत्य आहे की नाही ? तेव्हा सरळ प्रश्न विचारला पाहिजे.जसं लंडनला , आता बघा. पण विचारा म्हटलं की म्हणतात , श्री माताजी आम्हाला जागा मिळत नाही. आश्रम होत नाही.त्या करता आम्ही पुष्कळ प्रयत्न केले. आम्ही ह्याला भेटलो , त्याला भेटलो. तेव्हा मी म्हटलं असं का ? तुम्हाला काय नवीन आलेलं आहे ? कशाला पाहिजे तुम्हाला ? म्हणे आम्ही सहजयोगी. म्हटलं म्हणजे काय ? तुम्हाला चैतन्य लहरी आल्या आहेत ना ? हो म्हणे. मग ते तुम्ही वापरलं कां ? नाही , आम्ही नाही वापरलं. आम्ही गेलो मेयरला भेटायला. मी म्हटलं मेयर कोण होतो माझा ? तुम्ही परमेश्वराला म्हटलं कां ? तुमच्या व्हायब्रेशनला पाहिलंत का ? हे सगळं वापरा आणि बघा. तुम्हाला मिळतं की नाही. आता फक्त व्हायब्रेशन्स वापरायची. बाकी काही नाही.

बुध्दी सुध्दा नको वापरायला. कारण ही बुध्दी मर्यादित आहे. काय असेल नसेल ते नुसत्या व्हायब्रेशन्सनी बघायचं.तुम्हाला काही हवं असेल ते चक्रांना सांगायचं. हृदय व हृदय चक्रावरती बंधनं घालून ठेवायची. मात्र रेसचे घोडे मागायचे नाहीत. मागायचं ते राजाला मागण्यासारखं मागीतलं पाहिजे.भिकारड्यासारखं काय ? भिकाऱ्यासारखं मागायला भिकाऱ्याला काय कधी राजाकडे नेतात का ? तेव्हा मागायचं ते काही राज्य पद मागितलं पाहिजे. आणि जेव्हा असलं काही मागणं होतं. तेव्हा सगळं काही येणारच नाही. तुम्ही जर अढळपदाबरोबर बाकीचं काय आहे ? ते सगळं येणारच.आहो ! एखाद्याला जर राज्य मिळालं. समजा एखाद्याला आपण प्रेसिडेंट केलं. तर त्या प्रेसिडेंटच्या घरात त्याला जे काही मिळेल.ते सगळं फुकटचं मिळतं की नाही ? पण तो म्हणाला 'मला रेसिडेन्स (घर) वगैरे मिळालं पाहिजे' , मग लोक म्हणतील ह्या वेड्याला कोण करणार प्रेसिडेंट ? चपरासी बनवून टाकतील. ह्या साध्या गोष्टी आहेत.

तुमचं चित्त तयार करायला व्हायब्रेशन्सवर असतं. तर तुमचं चित्त जे आहे ते सत्य होणार आणि तुम्हाला आश्चर्य वाटेल पदोपदी ह्याचा तुम्हाला अनुभव येणार. तुम्ही म्हणाल हे घडतं कसं ? काही समजत नाही.ते काही शक्य नव्हतं.आम्ही तिकडे गेलो त्यांना भेटायला आणि ते तिथेच. हे सारं घडतं. काय फडके खरं आहे का ? ('हो माताजी ! अतिशय अनेक अनुभव आहेत') हे तुम्हाला खरं वाटेल. जसं आता तर संबंध चित्तच आहे ना ? परमेश्वराचे चित्त संबंध धावत आहे. त्याच्यामागे तुम्ही धावले म्हणजे सगळे कारणी लागणार. (श्री. फडके म्हणाले माताजी ! निर्विचारते नंतर जे विचार येतात.त्याप्रमाणे वागले की , ते १०० टक्के खरं होतं. 'माताजी एक दोन नाही तर अनेक अनुभव आहेत) बघा. आणि तुम्हाला मी सांगते की , हेच झालं पाहिजे. आपलं चित्त हे सत्य झालं पाहिजे. आणि जे समोर येईल ते करायचं. कोणताही संकल्प असा करायचा नाही. किंवा आज त्या ठिकाणी गेलंच पाहिजे. किंवा प्लॅन करुन ठेवायचे नाहीत. फार तर समजा तिकिट काढायचं , काढतो. गेले तिकीट काढलं. आता समोर एखादा मनुष्य येऊन उभा राहिला.तर आपला काहीतरी संबंध आहे. तर चला सहजयोगाच्या गोष्टी सुरु.समोर का बसला ? सहजयोगीला लायक असेल म्हणून देवाने बसवले बसेल. आता मी कशाला तोंड बंद करून बसतोय. (श्री. फडके म्हणाले , 'बरोबर , माताजी , गोष्टी सुरु केल्या की , व्हायब्रेशन्स सुरु होतात , की ध्यान होतं'. माताजी , - लगेच होणार हे फार मोठे प्रचंड तत्व आहे. सगळीकडे पसरलेलं आणि ते सगळं कार्यान्वित आहे. ते सुंदर कार्य करत असतं. तुम्ही त्याला चान्स तर द्या. नुसतं मीम मी करत फिरता. तेव्हा असं चित्त जे आहे ते सत्य होऊन जाते).

सहजयोगात मी म्हणेन की , ही पहिली स्टेज आली पण. तरी आनंद येतो. ही आनंद येण्याची स्टेज कशी येते ? जेव्हा आपणआनंद आहे हे शोधतो. कुठे आनंद आहे ? आपण आनंदाला शोधत नाही , आपण दुःखाला शोधतो. म्हणजे पहिल्यांदा मोजत बसतो. माझ्यात किती बाधा आहेत ? हा दुःख भोग आहे. माझ्यात मुळीच बाधा नाहीत. मी आनंदात आहे , मजेत आहे. असं म्हणा तरी. म्हणून बघा. मी सांगतलं ना की , आता तुमची गाडी सुरु झाली. जरा ॲक्सलेटर दाबायला पाहिजे की नाही ? आनंद हा सगळीकडे पसरलेला आहे. त्या चित्तामध्ये आनंद भरलेला आहे. स्थिर होऊन तो उपभोगला पाहिजे ना ? तुमचं काय होतं , की लक्ष सगळं एकीकडे म्हणजे आपल्याकडे ह्या बाधा भरलेल्या आहेत. भरतात कशा ? शक्यच नाही.

(श्री. फडके - माताजी ज्याला बाधा असेल त्याच्या नावाला चप्पल मारली. नी आपल्या नावावर चप्पल मारली की हमखास अगदी उपयोग होतो.) माताजी - 'बरं आहे , चप्पल मारुन बघा. पण चप्पल मारल्या की नंतर काय होईल ? की नुसता हा खेळ आहे. चप्पल सुध्दा हा मनाचा खेळ आहे.' तुम्हाला सांगते , बाधा तुम्हाला धरते कशी ? उलट तुम्ही धराल सगळ्यांना. जसं मी धरते तुम्हाला. आता , मीच धरलंय तुम्हाला. लोक म्हणतात की त्या बाईच्या नादी लागलात. पण तुम्ही मला सोडून पळतां कां ? आनंद कसा आहे ?

आपण जर सतत एखाद्या गोष्टीचा विचार करत बसलो की ,

'हो बाधा आहे' मग येणारच नसली तरी येणार. मनुष्याचं डोक काय आहे ? सहजयोगानंतर हलकं व्हायला पाहिजे. कारण परमेश्वर साक्षात तुमच्यात आहे. त्याचा प्रकाश येतोय. बघू या , कसा आहे ? असा विचार मनात आणला पाहिजे. पण लागलीच डोके धरुन बसले.

हा प्रकाश तरी बघू या. आता लहान मुलांचंच बघा. त्यांना किती आनंद असतो. पहा , कोणत्याही गोष्टींची बंधनं (Attachment) नाही. त्यांना वेळ वगैरेच काही नाही. उद्या खेळले , नंतर पाणी पाहिजे झालं , संपलं. त्यांचं तसं नाही की माझा भाऊ , माझ्या बापाला बरं करा. बरं केलं. आता माझे आजोबा आहेत. त्यांना बरं करा. मी म्हटलं कमाल तुमची. तरी बरं. पण तुम्ही तुमचा स्वतःचा विचार केला कां ? मग माझ्या मुलाला कोण बरं करणार ? असं हे सगळं चालतं. तर अरे ! तुमच्या आनंदाचा विचार करण्याचे सोडून हे कसलं काय तुम्ही जोडून ठेवलं आहे ? आनंदाचा विचार करायचा म्हणजे आता श्री माताजींनी मजा दिलेली आहे. बघू तर खरी काय मजा आहे ती ? पण सगळं कसं पालथं. कॅन्सरचे पेशंट आहेत कां ? बरं बरं आम्ही श्रीमाताजींना निरोप करतो हो ! मग म्हणायचं , 'माताजी ! हे बघा , हे आमचे जे पेशंट आहेत. त्यांना तुम्ही बघितलं पाहिजे. हे झालंच पाहिजे. झालं. पण अहो ! तुम्हाला जर काही असं दिसलंना तर , त्यांना म्हणावं हे बघ , श्री माताजींचा फोटो घ्या. आणि फोटो समोर दिवा लावून मीठाच्या पाण्यात पाय बुडवून फोटो समोर बसा. म्हणजे तुम्हाला आराम येईल. नक्की शंभर टक्के. बरं , बाकी काही करायला नको.

पण ते नाही. जगाच्या उचापत्या करायच्या , ते काही नाही. श्री माताजींना आम्ही सांगून ठेवलं आहे.' माताजी तुम्ही बरं करा बस्स एवढं'. 'ठिक करा' , असं जरी सांगितलं तरी आम्ही ऐकतो. पण तेवढं पाहिजे ना ! नुसता विश्वास ठेवा. श्री माताजींना सांगीतलं की , माताजी करतात. आमची कामं श्री माताजी करणारच असा आत्मविश्वास हवा. हा विश्वासच सगळं आहे. तुम्हाला तसा विश्वास नाही. त्यासाठी फोन केला पाहिजे. किंवा सतरांदा सांगीतलं पाहिजे. मग श्री माताजी म्हणतील , 'बरं बरं करते हा'. पण श्री माताजींनी कशाला लक्षात घेतलं पाहिजे. तसं काही नाही. श्री माताजींना सांगीतलं ना ! त्या करणार. म्हणजे आम्ही ते पक्कं धरणार. तुमचा शब्द खाली पडू देणार नाही. तुम्ही सांगून बघा , मग झालं , केलं , जरी तुम्ही मला बघितलं , श्री माताजी ! आमचा ताप उतरवा. आम्हाला काय ते सर्व माहित आहे. उतरवा म्हटलं की उतरलाच पाहिजे. उतरणारच. ऐका. कोणताही ताप असला तरी उतरवून ठेवतील. नुसतं सांगायचं की झालं. मला फोन करून बसायचं - फोन कशाला ? फोन हृदयामध्ये आहे , तेथे सांगीतलं की झालं. मात्र विश्वास पाहिजे.

जेव्हा आनंदाच्या लहरी उठतात. तेव्हा असा आनंद होतो. असं म्हणायचं की 'अहाहा ! काय हे साम्राज्य मिळालं. आम्हाला नुसते हुकूम सोडायचे. किती लोकांचं कल्याण होतं ह्या हातातून , हे देवाला ठाऊक आहे'. दुसरी गोष्ट म्हणजे स्वतःचे दोष काढून त्यावर रडत बसायचं. भयंकर घाणेरडी सवय आहे. मी किती वेळा वाबापुता करनू सांगितलं की तसं करू नका. तरी तेच म्हणून मी म्हणते की कान धरून बसा. ते एवढ्यासाठीच. की , स्वतःचे दोष काढत बसू नका. तुमचे काय मोठे दोष आहेत ? ही कोणती एवढी मोठी गोष्ट आहे ? अहो ! आमच्याकडे साबण आहे. तो सगळं तुमचं धुवून टाकील. तुमच्याजवळ काय आहे ? एवढं म्हणते तरी तेच. आईच्या प्रेमाच्यावर आहे का काही ? असेल तर सांगा. एखाद्या लहान मुलाचा हात जरासा खरचटला की तो रडू लागतो. आई बिचारी नेहमीच स्वच्छ करून देते ना ! तसं हे आहे. पण रडतच बसले. कसली गोष्ट तुमच्यामध्ये आहे ? बघू दे. मला तर काहीच दिसत नाही. तुम्ही सगळे गुलाबासारखे दिसता. आणि स्वतःचेच काटे काढत बसायचे. मग तुम्हाला आनंद कसा येणार ? अरे ! तुम्ही काही तरी विशेष आहात म्हणूनच इथे बसलात की नाही ? मग कितींदा सांगायचं ? विराजमान व्हा. शिवाजी महाराजांच्यासारखे. साधू आणि गुरु हे सगळे तुमच्या चरणात घातले. आता बसा तिथे सिंहासनावर. पण स्वतःची घरची मंडळी जवळ करायची. खरी (Generousity) करायची. आता एक गृहस्थ आले व म्हणाले मी तुम्हाला घरीच येऊन भेटणार. म्हटलं कां ? मला इकडे आलं म्हणजे धरतं. मी म्हटलं असं कां ? असले घावरे भितरे मला नकोत. तुम्ही येथे आला की धरतं का सुटतं ? तुमच्यासारखे शहाणे पुष्कळ आहेत. अति शहाणे , मग म्हणा , दुःख होतं. अरे ! दुःख होणारच !

काय हो इतकी संपदा ! आणि तुम्हाला माहिती नाही. ते संत लोक कुठे ? तुकाराम झाले एकटे कुठेतरी ते. त्यांना सतावणारे शंभर. ज्ञानेश्वर झाले. तीन चार भावंडे. तरी त्यांना सुध्दा छळलं. कोणाला सोडलं या लोकांनी ? एकटे एकटे धरून मारलं. आता तुम्ही इतके जण आहा., तरीसुध्दा असं कसं ? एक दुसऱ्याचा आनंद घ्यायचा , आत बघायचं. काय मजा आहे आतमध्ये ! किती मंडळी आहेत ? अगदी एकाहून एक. आता मी तर तुमची मजा लुटते आणि तुम्ही काय जाणत नाही ? मला समजत नाही.

आता असं झालं गळ्यामध्ये माळ घातली. त्यात अनेक महत्वाचे खडे आहेत. ती मला सोडवयाची आहे. आणि मोती मात्र आपापसात घासून घासून संपले ! याला काय म्हणायचं ? आनंद हा किती आहे ! पण त्यासाठी थोडं स्थिर होऊन बघा. आनंदाचा शोध जो आहे , तो म्हणजे आपल्या मनामध्ये असे घाणेरडे विचार यायला लागले , जे आनंदाला पोषक नाहीत. ते सगळे घाणेरडे विचार आहेत. काय सांगायचं ? कशाला ते विचार येतात ? नेहमी परमेश्वराला विचारायचं की कशाला असले घाणेरडे विचार आमच्या मनात येत आहेत ? म्हणजे कोणाला कधी मिळलं नाही ते मला मिळालं आहे. अलभ्य असं. केवढ्या उंच पदाला मी गेलेला आहे ! मी काय रडत बसणार आहे. ? माझ्या आनंदाला मी मुकणार नाही आणि ते आनंद तत्व जेआहे. सत् चित्त आनंद. तो आला पाहिजे.

आनंद तत्व हे प्रकाशाच्या ज्योतीसारखं आहे. जसं जसं ते तेवत ठेवाल तसा तसा त्याचा आनंद होईल. प्रकाशाच्या ज्योती माणसाला सत्य कळतं. की हे काय असेल ? पण हे सर्वांचेच आहे म्हणा ! आणि ते जे काय आहे ते परमेश्वराचे प्रेम आहे. तो अहोरात्र देऊन राहिला आहे , ते सगळं मिळून काय आहे ? तर प्रेम आहे .....तुमचं जर का कुणावर प्रेम असलं ? तर त्या माणसाबद्दल , मुलाबद्दल , ज्याच्याबद्दल तुम्हाला प्रेम असेल ते सगळं काही तुम्हाला कळतं. की सत्य काय आहे ?

तेव्हा आनंदाचा उगम होतो. तुमचं संबंध चित्त तिकडे गेलंय. तरीही परमेश्वर इकडे आहे. परमेश्वरी प्रेमामध्ये आणि मानव प्रेमामध्ये एकच अंतर आहे. पण ते फार मोठं अंतर आहे. आत्म्याचंदर्शन हे परमेश्वरी प्रेमात आहे. आणि मनुष्य प्रेमामध्ये सुख आणि दुःख हे असू शकतं. त्याला दोन धावा असतात. त्या रात्रंदिवस असू शकतात. पण परमेश्वरी प्रेमामध्ये फक्त आनंद नी आनंद, त्याच्यात दुसरी गोष्ट नसते तेव्हा हे आत्म्याचं प्रेम आहे. मनापासून निखालस तुम्ही जर कोणावर प्रेम केलं विशेषतः जर तुम्ही मनापासून परमेश्वरावर प्रेम केलंत, तर त्यावेळी तुम्ही विचार करत नाही.

मानवाला विचारांची सांगड मध्ये आली की लगेच त्याला (Artificial) (कृत्रिम स्थिती) येते. पण मनापासून अत्यंत जिव्हाळ्यांनी आपण जे कार्य करतो ते आत्म्याच्या आशीर्वादाने होते. आत्मा हा बुध्दी, अहंकार व प्रति अहंकार या सर्वांच्या पलीकडे असतो. आणि जेव्हा त्याचा प्रकाश त्या सर्वांमध्ये येतो. तेव्हा असा मनुष्य सामुहिक व्यक्ति होऊ लागतो. व्यक्ति ती व्यक्ति आहे. पण आत्मसाक्षात्काराशिवाय काहीही गोष्टी करणे, म्हणजे वायफळ आहे. आत्मसाक्षात्कार हा झालाच पाहिजे. त्याच्याशिवाय कोणत्याही गोष्टीला अर्थ नाही. उगीचच लोक आपला वेळ घालवत आहेत.

आता आपल्या आनंदाकडे थोडसं लक्ष घाला. आपण नेहमीच सकाळी चारला ध्यान केलं. आता आपल्यात आनंद कोठे आहे ? ते पहायला पाहिजे. आणि जेव्हा काही असं विचारलं की, मात्र म्हणायचं की आम्हाला नको. ह्या सवयी जुन्या आहेत. त्या सोडल्या पाहिजेत. तुमच्या सर्वांच्या आनंदाच्या उर्मी एकच आहेत.

लंडनला एक गोष्ट झाली. एक मुलगी आमच्या कार्यक्रमाला यायच्या आधी तिला एकदम आनंद व्हायला लागला. तिला काही समजलं नाही. कारण ती फार भित्री होती. कारण तिचा नवरा तिला फार छळतो. तर ती आमच्या कार्यक्रमाला आली. आणि सारखी आनंदात होती.

ती आल्यावर मला म्हणायला लागली की आता मला कळलं की मला जे काय होत होतं, मी जसजसे तुमच्याकडे हात केले, त्यावेळी फारच आनंदाच्या लहरी येऊ लागल्या. पण ती सहजच पूर्वी एकदा पार झाली होती. त्याचा अर्थ असा आहे. लंडनला तिची स्थितीच अशी आहे. हे अचाट आहे. तिचा हातही जळला नाही की काही नाही. पण तिने म्हणे, माझा फोटो एकदा पाहिला होता. ती कार्यक्रमाला आली तेव्हा तिला इथेच कळलं होतं की काय झालं ? कसा आनंद झाला ? आणि आता ती आनंदात आहे. तिची ही स्थिती म्हणजे पूर्व संपदा होय.

तेव्हा आमच्या मुलांचं, आईच्या बहिणींचं असं झालं पाहिजे. असा विचार करण्यापेक्षा आमच्यात हे झालं पाहिजे. असा विचार सुरु केला पाहिजे. तेव्हा ह्या सर्व सद्गती प्रेमळ पाहिजेत. बाहेर आम्ही काम काय करतो ? काम किती करतो ? ह्यात महात्म्य नाही. आमचं काय होतं ?आम्ही जे हे काम करतो. त्याला महत्व देतो. परंतु प्रेमातून जे होतं त्याला महात्म्य आहे. सहजयोगाचा हा पायाच आहे.

परंतु इकडं लोकांचं हे असं आहे. पाच दिवस तुम्ही उपास करा. सात दिवस तुम्ही सिध्दी विनायकाला खेटे मारा. त्यानंतर देवळातल्या त्या पंडीताला एवढे पैसे द्या. काही तरी असले धंदे करा. काही तरी पैसे घाला. काही नसलं तर तुम्ही आठ दिवस डोक्यावर उभे रहा, असा काहीतरी प्रकार किंवा अशा करामती करायच्या. असं सांगतात. पण सहजयोग म्हणजे तसा अगदीच वेगळा आहे. ते (आत्मतत्व) तुमच्यात (जागृत) झालं पाहिजे. कळलं का ? हा ह्याचा पाया आहे. सहजयोगाचा तेव्हा आता तुम्ही काय बनला ? हे पुढे कळायला पाहिजे. तुमच्यात काय बदल होत आहे ? काय घटित होते आहे ? हे कळायला पाहिजे. इकडे मुख्य लक्ष दिलं पाहिजे. बाकीचं मुळी होतच आहे. तुम्ही बनला तर सगळं बनणार. आता ही पृथ्वी जितकी तुम्ही जाणता तेवढीच आहे ना ! की त्याच्या पलीकडे आहे ? तेव्हा तुम्ही ठिक झाल्यावर तुमची दृष्टीही ठिक होणार. तुम्ही ठिक नाही म्हणून सगळे घाटाळे आहेत. म्हणजे तुमची दृष्टी ठिक नाही. हे सगळं जगामध्ये चालूच आहे. आता अगदी 'परफेक्ट कंडिशनींग' हवे असे जर तुम्ही म्हटलेत तर किती परफेक्ट होणार ? तुमचा हा परफेक्ट दिसला पाहिजे. हा सामान्य विचार आहे. हा विचार म्हणजेच मध्यात राहणं. अहो ! सारे जग परफेक्ट असायला पाहिजे हे कसे शक्य आहे ? तुमच्यात व त्यांच्यात परफेक्शन म्हणजे काय ? असले प्रकार हे गुंतागुंतीचे होणार. पण जर तुम्ही असं म्हणाला की, मनच परफेक्ट व्हायला पाहिजे. म्हणजे आपण 'स्वतः' व्हायला पाहिजे. म्हणजे स्वतःला वाईटात काढू नका. समजलं ! हा आनंद आम्ही इथे जोडला आहे ना ! तुम्ही एकदा आनंदाचा स्त्रोत आपल्यात काढू शकता. सहजयोगात आलात म्हणून तुम्ही स्वतंत्र आहात. मला तर समजत नाही. दुःख करण्यासारखं काय आहे एवढं ? सगळं तुम्ही आतूनच बघा, रागदारी बदलायला पाहिजे. मग सगळा देखावा बदलतो.

तुम्ही समजा लाईट सारखे आहात. आम्ही तो लाईट पहातो. तुमचा लाईट जो रंग घेईल तोच उजेड पडणार. तुम्ही आपला रंग बदला हा रंग तुम्ही सहज बदलू शकता. कलियुगाच्या सत्ययुगात हे यायला काय लागतं ? माणसं किती बदलायला पाहिजेत ? फार नव्हे तुमच्यात आनंदाची साधी सुचीर्भुतता पाहिजे, मग बघा. मग [illegible] (प्रकाश) घालतो. सत् चित् आनंद परमेश्वराच्या सेवेत आहे. आनंद ही अनुभूती आहे. आणि सत्य ही प्रचिती आहे. आणि ही प्रचिती संबंध चित्ताला होते. जेव्हा या तिन्ही गोष्टी (आनंद, अनुभूति व चित्त) समग्र होतात. (इंटिग्रेटेड) तेंव्हा म्हणायचं की आमचा आत्मसाक्षात्कार पूर्णत्वाला आला.

आता सहजयोगासाठी काय केलं पाहिजे ? कसं वागलं पाहिजे ? नियम असा घालायचा नाही. नियमात बांधून घ्यायचं नाही. तर तुम्ही चैनत्य लहरींनी बघा. तुम्हाला संबंध स्तंत्रता आहे. तर बरोबर व चूक काय आहे ? चैतन्य लहरींनी पाहिलं पाहिजे. साधारण सगळ्या गोष्टी आपल्याला माहित आहेतच. पण चैतन्य लहरींना नक्की सत्य काय आहे ? ते कळतं. आणि चैतन्य लहरींच्या नफा नुकसानीवर जर तुम्ही चालू लागला. तरआनंदाचे झरे फुटतील. तुमच्यामध्ये. मात्र फक्त एक जाणलं पाहिजे की सर्व कार्य परमेश्वर करतो. अत्यंत हितकारी आणि कल्याणकारी आणि तेच माणसाला करायचं आहे. परमेश्वराशिवाय कशाचाही उहापोह ह्या संसारात करायला नको.

# परमेश्वराचे कार्य व दुष्ट शक्ति

## इंग्लंड, ३१ मार्च १९८३

मला स्पष्ट कळतंय की, जेव्हां परमेश्वराच्या दृष्टिकोनातून जर काही फार मोलाचं असतं तेव्हा दुष्ट शक्ति त्याला विलंब कसा करावा, त्यात अडथळे कसे आणावे, त्याला (मार्गावरुन) दूर कसे करावे, त्याला हरकती कशस आणाव्या (याबद्दल) त्यांच्या योजना कार्यरत करतात. ते फार आश्चर्यकारक आहे. आज जर तुम्हाला मी परमेश्वरी इच्छेबद्दल (काही) सांगितलं आणि आपण मानव (लोक) सतत त्यांच्या विरोधात जाण्याचा कसा प्रयत्न करतो (हेसांगितलं) तर ते फार चांगलं होईल.

परमेश्वराची इच्छा अत्यंतिक साधी आहे. तो परमेश्वरी प्रेम आहे. तो करुणा (मय) आहे. तो दया-क्षमेचा सागर आहे. त्याने हे विश्व निर्माण केले आहे आणि जीवनातील अत्युच्च गोष्ट - आनंद त्यांना देण्यासाठी नंतर (त्याने) मानव निर्माण केला आहे. आनंद जी फार साधी गोष्ट आहे. जिच्याकडे उसन्या आनंदाप्रमाणे 'द्वैत' नसते. परंतु आपण कसे परमेश्वर विरोधी आहोत, आनंदविरोधी आहोत आणि ते तसे का घडते ?

आपली 'जाणीव' तुम्हाला माहित आहेच, की आपल्या मेंदूमधून खालच्या बाजूकडे वाढत असते. आणि जे अधोगतीकडे वाढत असते तेच आपल्याला ईश्वरापासून दूर नेते. अंतीम, आपल्याला परमेश्वर प्राप्त करायचा आहे. परंतु प्रथम ईश्वराशी 'एक (रुप) आहोत या जाणीवेपासुन थोडेसे दूर जातो. ते समजून घेण्यासाठी स्वतंत्रता योग्य रित्या वापरली गेली पाहिजे. त्या शिक्षणाशिवाय, ते स्वातंत्र्य मानवाला देण्यात (काही) उपयोग नाही. तुम्ही स्वतंत्र देश पाहिलेले आहेत. त्यांच्या स्वातंत्र्यातून त्यांनी काय साध्य केले आहे - आपल्याला मारण्यासाठी अणुबॉम्ब ! हा (निव्वळ) मुर्खपणा आहे. हा बेअकलीपणा आहे. हे असमंजस आहे. परंतु ते आम्ही केले आहे. आम्हाला त्याचा गर्व आहे आणि आमच्या (नाशा) साठी अधिकाधिक वाईट (त्रासदायक) ते कसे बनवले जाईल म्हणून अद्याप त्या कामात गुंग आहेत. ही अशी प्रगती करत आहोत. आपल्या स्वतंत्र्यतेची परिक्षा घेण्यासाठी, अनुभव घेण्यासाठी आणि पाहण्यासाठी, जाणीव जी आपलीच होती, ती मानवी जाणीव आपल्याला दिली होती आणि अखेरची म्हणून, अंतीम स्वतंत्रता प्राप्त होण्यासाठी ज्यामुळे तुम्ही 'आत्मा' बनता, (ती ही दिली होती).

तुम्हाला शेवटी 'आत्मा' व्हायचे आहे, परंतु आपण आपल्या तथाकथित जाणीवेत वृध्दींगत होण्यास सुरुवात करतो, आणि आपला संबंध आत्म्याशी नसतो. मी म्हणेन आपण वृक्षाप्रमाणे आहोत. जे त्याची मुळे पृथ्वीमध्ये खोलवर रुजवतात, ज्यामुळे ते उभे राहते आणि वाढते, त्याचप्रमाणे मुळे आपल्या मेंदूमध्ये आहेत आणि नंतर आपण वरवर वाढू लागतो, अगदी पालवी फुटेपर्यंत, फुले उमलण्यापर्यंत आणि फळे निर्माण होईपर्यंत ! परंतु उलटपक्षी, फळाच्या स्थितीपर्यंत येईपर्यंत आपलं काय होतं की आपण कृत्रिम पाने निर्माण करायला सुरुवात करतो. आणि त्यातून आनंद घेतो. जेव्हा हे तादात्म्य कृत्रिमतेसह सुरु होते, तेव्हां आपण सत्याकडून दुष्ट विचारांकडे (निगेटिव्ह) सरकण्यास सुरुवात होते किंवा अति-सुष्ट (ओव्हर-पॉझिटीव्ह) विचारांकडे, जे खरोखरचे परमेश्वर विरोधी असतात कारण, त्यांची धारणा आहे की आम्ही ॲटमबॉम्ब बनवतो आणि सर्व तसलं काही . . .

म्हणजे त्याच्या खरोखरच्या दोन शाखा आहेत. तशा आपल्या दोन शाखा पडतात. काही लोकांना डाव्या बाजूला जायला आवडते किंवा दुष्ट प्रवृत्तीकडे (निगेटिव्ह) ते स्वतःचा नाश करतात, स्वतःस त्रास घेतात आणि सर्व प्रकारच्या अशा गोष्टी करतात, ज्यामुळे ते मृत्यु पावतात, आणि तो पण आत्यंतीक हिनदीन पध्दतीने ! ते स्वतःवर सर्व प्रकारचे रोग ओढून घेतात.

ते त्यांच्या देहाला यातना देतात. त्यांचे जवळ असलेल्या प्रत्येक गोष्टीला ते यातना देतात. नंतर दुसरी बाजू आहे. उजव्या हाताकडची बाजू, ज्यामध्ये ते दुसऱ्यांना यातना देण्यासाठी, दुसऱ्यांना नष्ट करण्यासाठी, दुसऱ्यांवर शक्ति सामर्थ्य गाजवण्यासाठी पुढे येतात. दोन्ही मार्ग परमेश्वरापासुन, त्याच्या दयाक्षमेपासुन आणि त्याच्या कृपेपासुन दूर आहेत. शेवटपर्यंत आत्म्याशीच 'संबंध' असला पाहिजे. तरच फक्त योग्य दिशेने आपली हालचाल आहे. मानवात हा संबंध (नाते) अगदी सहजपणे तुटतो. कारण त्यांना ते करण्याचे स्वातंत्र्य आहे, आणि अहंकारात ते लोक तो (संबंध) पुष्कळच तोडत असतात, कारण जेव्हा

तुम्ही सुखासीन जीवनाचा कृत्रिम मार्ग विकसित करता तेव्हा 'त्याचे' अस्तीत्व आहे 'तो' एक असा आहे की जो (सारा) खेळ चालवत आहे ही परमेश्वराची चेतना (जाणीव) हरवून जाते. आपण आपल्याबद्दल एवढे जागृत बनतो की आपल्याला वाटते काही (आपले) चुकीचे नाहीये. आपण हे करतो, आपण ते करतो आणि सर्व प्रकारच्या समस्येमध्ये बुडून जातो. जे आपण करत आहोत, ते खरोखर आपल्या विरोधातले आहे, आणि आपल्या म्हणजे परमेश्वराच्या कारण ईश्वराने आपणाला निर्माण केले आहे. आणि तो आपल्यावर प्रेम करतो. आपण आपल्यावर प्रेम करत नाही. जर आपण आपल्यावर प्रेम केले असते, तर आपण आपल्या शरीराला आणि आपल्या स्वतःच्या (शरीरातील) संस्थांना आणि 'चुकलं काय?' 'ते का करायचं नाही?' हे म्हणून जे सर्वकाही आपल्याकडे आहे त्यांना अपशब्द बोलली नसतो. तुम्ही तुमच्या या शरीरावर, या तुमच्या मनावर आणि या समाजावर प्रेम केलेच पाहिजे. तुम्ही तुमच्याकडे जे आहे त्यावर प्रेम केलेच पाहिजे. कारण परमेश्वराने त्याच्या प्रेमात तुम्हाला निर्माण केले आहे. परंतु 'प्रेम' अगदी विकृत (विपर्यास असलेला) शब्द झाला आहे. आताच्या सकरा (सरमिसळ, गोंधळा) मध्ये काय चुकीचे आहे ? ते प्रेम आहे? जर मी तुम्हाला सांगितले, ते (प्रेम) नाहीय, कारण ते निसर्गाच्या विरुध्द आहे, आणि ते तुम्हाला त्रास देते. तुम्ही गोंधळात / विचकक्यात अडकाल. परंतु लोकांना वाटेल की ही स्त्री पोक्त आहे, ती जुन्या (रितीची) वळणाची आहे, आणि व्हिक्टोरिया राणीच्या काळातली आहे. ऐकून घ्या. ही सत्यस्थिती आहे. आपण गोष्टी, ज्या नाशवंत होणार आहेत, त्या कां करतो ? तुम्ही स्वतः निर्माण करू शकत नाही. - तुम्ही तुमच्यासाठी देखिल गुलाब तयार करू शकत नाही, तर सर्व शरीर तर सोडून द्या. तर आपल्या विरुध्दच आपण का असावे. तर आपण समाजविरोधी का असावे, (जो समाज) आपणच निर्माण केला आहे. किंवा संपूर्ण राष्ट्राविरुध्द किंवा सर्व राष्ट्रांविरुध्द का असावे, जी आपणच निर्माण केली आहेत. ते सर्व राजकारणी आज काय करत आहेत ? लढाई, कशासाठी ? त्यांचेकडे केवळ पहा. मला समजत नाही ही लढाई कशासाठी ? विध्वंसक शक्ती, व फार भयानक गोष्टी निष्पाप मानवजात नष्ट करण्यासाठी निर्माण करणे - (हे कशासाठी ?), जे अगदी निष्पाप आहेत, त्यांना धमकी दिली जाते. त्यांना समजत नाही की त्यांनी उद्या का मरावे कारण काही लोकांची डोकी भ्रमिष्ट झाली आहेत. आणि ज्यांची डोकी भ्रमिष्ट झाली आहेत ते आमच्या (राज्यकारभाराच्या) व्यवस्थेत मार्गदर्शक (सुकाणू म्हणून) आहेत.

ती अशी 'निगेटिव्हीटी' आमच्यात वाढत असते. आपण निगेटिव्ह बनतो. दोन्ही निगेटिव्ह वृत्ती आहेत कारण ते परमेश्वराचे अस्तित्व नाकारतात.

परमेश्वराचे अस्तित्व नाकारणे हा प्रथम गुन्हा आहे, जो आपण केला आहे. आपण देवालाही भित नाही. (परंतु) तो करुणामय आहे. तो दया-क्षमा आहे. तो सर्व काही आहे. तो त्याच्या दयेतच, हे जग तो नष्ट करणार आहे. तो त्याच्या विरुध्दची पापे करायला यापुढे परवानगी देणार नाही. तरी अन्य तऱ्हेने तो विनाश करतो. कॅंसर काय आहे ? सर्व प्रकारचे हे रोग, जेआपल्या शरीरात उद्‌भवतात ते काय आहेत ? ते (काहीही नसून) फक्त आपल्या विध्वंसक शक्ति आहेत. ज्या आपण आपल्यातच तयार केल्या आहेत. आपल्या बाहेरुनच्या कोणत्याही ग्रहाच्या किंवा पृथ्वीबाहेरीलच्या हल्ल्याची भिती नाहीय. . नाही, तसलं काहीही नाही. तो आपल्यातच आहे, जो हल्ला तयार होतो, त्याच्याबद्दल जागृत राहिले पाहिजे. स्वातंत्र्याच्या नावाखाली आपण आपल्यातच विनाशाचे जंतु एकत्र केले आहेत. ती एवढी अंतर्गत तयार असलेली पध्दती आहे, आपणास जाणीवही नसते की (तेथून) हे हल्ले येत आहेत - आणि ते तेथेच (तयार झालेले) आहेत. आम्ही आमच्याशीच, आमच्या कृत्रिम जीवनाशी, शिष्टाचाराशी आणि उथळ वागण्याच्या पध्दतीशी पूर्ण समाधानी आहोत.

जन्मापसून (नैसर्गिक) आपल्यातच 'आत्मा' राहतो, जो तुम्हाला आत्मसाक्षात्कारी (प्रकाशित) करणार आहे. शांती देणार आहे. शाश्वत सुख आणि आपल्या अस्तीत्वातील आनंद देणार आहे. हा तुमच्यातील सुंदर दीपक एका हेतूने निर्मिला आहे. तो प्रज्वलीत (प्रकाशित) केला पाहिजे. स्वतःस मान द्या. आजकाल 'मान' नावाचा शब्दच शब्दकोशात उरला नाही. स्वतःस मान द्या. या दिव्याला आपण मान दिलाच पाहिजे, त्याच्याजवळ आत्म्याचा प्रकाश आहे, आणि तो प्रकाशित केला पाहिजे. तो दिवा राहू द्या, त्याला 'प्रभा' आहे. हे एवढे सुंदर विश्व आहे, जे ईश्वराने आमच्यासाठी निर्माण केले आहे. परंतु आम्ही आमच्या अज्ञानात, तथाकथित स्वतंत्र्यात कित्येक गोष्टी नष्ट केल्या आहेत.

लोक कोठे जात आहेत - प्रत्यक्ष नर्काकडे (हे) पाहणे फारच धक्कादायक आहे. आई म्हणून ही गोष्ट फार संबंधीत आहे. हे अधःपतन कसे थांबवावे ? त्यांना त्याच्या बाहेर कसे काढावे ? त्यांना त्यांची किंमत; त्यांचे मुल्य काय आहे ते कसे समजावे ? तुम्ही मानवी जीवन 'ग्रहीत' समजू नका. ते फार मौल्यवान जीवन आहे जे पुष्कळ पध्दतीतून निर्माण केले गेले आहे. ते मोठ्या अडचणी सोसून तयार केले आहे. विसरू नका की तुम्हाला 'आत्मा' बनायचे आहे, ज्याशिवाय तुमचे जीवन

नाश (वाया) आहे. नव्हे, संपूर्ण निर्मिती केवळ नाश आहे. कारण तुम्ही निर्मितीतील उच्च (श्रेष्ठ) आहात. तुम्ही निर्मितीचे परमसार आहात.

आणि आपण कुठपर्यंत (आलो) आहोत ? आपल्याला अशी अणुशक्ति तयार करायची आहे, जी परमेश्वराबद्दल उघडपणे बोलेल. मी (आश्चर्याने) गुंगच झाले की या देशातील लोकांना ईश्वराबद्दल बोलायला आवडत नाही. तुम्ही परमेश्वराबद्दल बोलू शकत नाही ? तुम्ही अशा राज्यव्यवस्थेची कल्पना करु शकता का ज्यामध्ये तुम्ही तुमच्या निर्मात्या (परमेश्वर) बद्दल बोलू शकत नाही किंवा (जेथे) समजू शकता की धर्म म्हणजे काहीही (एक) नाही. किंवा एक तुम्ही काहीशी अशा प्रकारची गुप्त संघटना तयार करावी ज्यात कुणीही एक प्रवेश करु शकत नाही., आणि असं म्हणायचं की (आता) आम्ही एक ठराविक पंथाचे आहोत. ईश्वराला पंथ कसा (काय) असू शकतो ? जरा विचार करा. वेगवेगळी चर्चेस, मंदिरे आणि वेगवेगळ्या मशिदी त्याच्या (परमेश्वराच्या) कशा काय असू शकतात ? ईश्वराच्या नावावर आम्ही धर्मवेडे कसे होऊ शकतो ? तुम्हाला कल्पना आहे की हेच काय ते सर्व आपण परमेश्वराप्रत केलेले आहे. आम्ही धर्मवेडे बनले आहोत. असा एक पत्थर आहे, जो जेव्हा स्पर्श करतो, तर तो सोने बनते. परंतु असा एक (परीस) दगड असलाच पाहिजे. जेव्हा तो मानवजातीला स्पर्श करतो तेव्हा ते (लोक) कैद्याप्रमाणे बनतात. ते (एक) कारण आहे, म्हणून इकडे इतका धर्मवेडेपणा आहे.

हीच एक समस्या आहे की ही (सु) वार्ता आणि हा संदेश कसा (लोकांप्रत) द्यावा की तुम्ही आत्मा आहात आणि तुम्हाला आत्माच बनायचे आहे.

माझी मातृभाषा मराठी आहे आणि मी परमेश्वराची कृतज्ञ आहे - माझा जन्म महाराष्ट्रात झाला आहे. कारण तो संतजनांचा देश आहे. या प्रांतात हजारो संत आहेत. ती परंपरा आहे. तो देश एवढा आध्यात्मिक आहे. अध्यात्म ही या जागेची परंपरा आहे, जेथे मी जन्मले आहे. महा म्हणजे मोठा व राष्ट्र म्हणजे देश. तेथील परंपरा अध्यात्मिकतेची आहे आणि नशाबाजी (व्यसनाची) नव्हे ! तसेच अपायकारक नशीली औषधांची किंवा कोणत्याही इतर 'इझम' ची नाही !

या देशाची परंपरा अध्यात्मिक आहे. जेथे अगदी साधा (संत) कवि - श्री नामदेवांनी जन्म घेतलाय. ते शिंपी होते. अगदी साधासुधा शिंपी ! परंतु त्यांनी पुष्कळ मधुर कविता (अभंग) लिहिल्या आहेत. मी स्पष्ट करते आहे की ते काय म्हणतायेत - 'लहानगा मुलगा आकाशात पतंग उडवत आहे. तो आकाशाकडे पाहात आहे. तो मित्रांजवळ बोलत आहे. तो इकडे तिकडे हालतोय आणि इकडच्या तिकडच्या गोष्टींची चर्चा करतोय. परंतु त्याचे लक्ष (ध्यान) (चित्त) पतंगावर नेहमीच केंद्रित (एकाग्र) आहे. नंतर ते म्हणतात, एका स्त्रीने तिचा लहानसा मुलगा कडेवर घेतला आहे आणि तिचे घरात सर्व काम ती करत आहे. तिच्या नवऱ्याला (ती) पाणी देत आहे, लहानग्या बाळाजवळ बसत आहे, जेवण करत आहे, धुणे करण्यासाठी उठत आहे. मूल तिच्या कमरेवर शांत पडून आहे. परंतु सदासर्वदा तिचे ध्यान (लक्ष) (चित्त) त्या बाळावर असते. एक स्त्री आहे. तिच्या माथ्यावर अगदी नाजूकपणे तोल संभाळून पाण्याचा घट आहे. ती इतर स्त्रियांबरोबर चालत आहे. जसे त्या एकत्र चालत आहेत, हसत आहेत, स्मित करत आहेत, एकमेकींबरोबर बोलत आहेत, परंतु त्यांचे लक्ष (चित्त) नेहमीच पाण्याच्या घटावर (मडक्यावर) आहे. एका अर्थी ते चित्त आत्म्यावर आहे (तसे चित्त आत्म्यावर हवे).

याचप्रमाणे जरी आपल्याला जीवन व्यतीत करायचे आहे. परंतु हे फार असमंजसपणाचे आहे की आपले चित्त आपल्या आत्म्यावर असत नाही, जो (आत्मा) जीवनातील अंतीम (सत्य) आहे. परंतु काहीतरी आध्यात्मयाबद्दल जेव्हा तुम्ही बोलायला सुरुवात करता, तेव्हा लोकांना वाटते की हे पुष्कळच कवडीमोलाचे आहे, ते ऐकू सुध्दा नये. त्यांना ऐहिक गोष्टी परत परत ऐकायला पाहिजे असतात. जर ते आकाशवाणीवर क्षेपित केले, समजा कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टी किंवा लेबर (पार्टी) ते तासन्तास ऐकत राहतील - असली ऐहिक बडबड. प्रत्येक वर्षी ते तुम्ही ऐकता. परंतु जर कुणी म्हणालं, नाही, हे सर्व कृत्रिम आहे. तुमच्याजवळ आतच (यापेक्षा) अधिक मौल्यवान काहीतरी आहे आणि तेच ऐका' त्यांना वाटते की, या सर्व गोष्टी ऐकण्यासाठी ते आलेले नाहीत. 'ते काय आहे' (तेच) जे ही आई आपल्यालासांगत आहे. ' परंतु आता जागृत व्हा आणि उठा. वेगवेगळ्या पातळीवर आपण समजून घेतले पाहिजे की या लोकांनी आजपर्यंत काय केले आहे आणि आपण ते स्विकारले आहे. वर्षानुवर्षे आपण जे गृहित धरले आहे ते क्षितिजापलीकडील आहे. आपल्या आत एक 'तारका' प्रकाशत आहे आणि तो आपला आत्मा आहे.

लोक त्याच्याबद्दल (आत्म्याबद्दल) बोलले, ईश्वराबद्दल बोलत राहिले, आणखी एक पंथ बनविला (त्यांनी) तो (पंथ) सांगत राहतो - की ते परमेश्वराचे कार्य करत आहेत या 'परमेश्वरी' कार्यात स्त्रिया त्यांच्या मांड्यांना बांधून ठेवतायेत, आणि त्यांच्या स्वतःच्या शरीराला तकाकी आणतायेत. (म्हणजे हठयोगाच्या 'हट्टी' क्रिया करतायेत) कल्पना करा. ईश्वराच्या नावावर हा असला भयंकर प्रकार (कार्य) ते करत आहेत. (मग

त्यांचं) स्पष्टिकरण असतं ते म्हणजे 'तुम्ही इंद्रियदमन अनुभवलेच पाहिजे !'

'तुम्ही स्वतःच का हे शरीरदमन करायचे ?' (त्यांचं उत्तर असतं) 'कारण श्री येशूंनी केलं म्हणून ! तुम्ही श्री येशू आहात का ? आणि त्याचा अर्थ असा होतो की जे जे श्री येशूंनी केले ते वाया (निरुपयोगी) होते. म्हणून तुमचे थोडे काही त्यात मिळवण्याची (जणू) गरज होती ! जे (त्यांनी) काही केले आहे ते गरजेपेक्षा अधिक आहे. (अधिक भरपूर आहे) कारण श्री येशू हे राजपुत्र होते. आणि जर राजपुत्राला शरीरदमन सोसावे लागते, त्याबद्दल (त्यांना) इतके मोठे असे काय आहे ? त्यांनी ते पूर्वीच केले आहे आणि त्यांनी आपल्यासाठी (कृति) करुन ठेवली आहे. त्यांना आपल्यामध्येच प्रकाशित करायचे आहे आणि याप्रमाणे आपल्याला आपला आत्मसाक्षात्कार करुन घ्यायचा आहे.

सर्वात सोपी गोष्ट करायची, ती म्हणजे बसायचे व प्रश्न विचारायचे. परंतु हे सर्वोत्तम की (तुम्ही) तुमचा आत्मसाक्षात्कार संपादन करावा. आजची तीच सर्वात महत्वाची गोष्ट आहे. अर्थातच या परिस्थितीमध्ये (आपण) मानव म्हणून ती फार जलदरित्या कार्यान्वित होणार नाही. मला त्याची फार खात्री आहे. मी फर फार प्रयत्न केला आहे. पर्वताप्रमाणे तुम्हाला कुंडलिनी उठवायची आहे. ते खरोखर पर्वत उचलण्यासारखेच आहे. तुम्हाला इतके दमल्याभागल्यासारखे वाटते. परंतु त्यांना त्याची किंमत करावी असे वाटत नाही. म्हणून निराशाजनक वाटू देऊ नका. त्याबद्दल दुखावले जाऊ देऊ नका.

मला खात्री आहे. हळूहळू आणि अविचलपणे तुमच्या स्वतृच्या डोळ्यातच लोक पाहतील की आनंद, शाश्वत सुख आणि ज्ञान याद्वारे तुमच्या जीवनाचे स्वरुप कसे बदलले आहे. ते पाहतील किती प्रेमळ आणि आनंदी तुम्ही बनलेले आहात आणि नंतर ते विश्वास ठेवतीलच की तुमचे जीवन अधिक चांगले आहे. काही लोक अशा काही वाईट स्थितीत आहेत की ते प्रत्येक गोष्टीमध्ये 'काळे चित्र' पाहतात. ते इतके निराश आहेत की त्यांनी (सर्व) सोडले आहे. त्यांनी केवळ सोडले आहे. ते (आता) म्हणताहेत, आता आम्ही ते सर्व संपवून (करुन) बसलो आहोत. आम्ही प्रत्येक गोष्ट केली आहे. आता आम्हाला अधिक काही करायचे नाहीच. मी फ्रान्समध्ये पाहिले आहे, तेथे ते जगाच्या अधःपतन आणि जवळ येऊन ठेपलेल्या नाशाबद्दल चर्चा करत आहेत. ते चर्चा करत बसले आहेत की चला आता संपून जाऊ या. पुरेसे झाले आहे आपल्याला ते सर्व. आता अंतीम नाश असू द्या, जरी तो ॲटमबॉम्ब किंवा इतर अन्य काही असो. ते अगदी निराशजनक आहेत. जे त्याबद्दल विचार करत आहेत आणि जे त्याबद्दल संबंधीत आहेत, त्यांच्या अत्यंत निराशेबद्दल मी समजू शकते. मी त्याबद्दल संचित आहे. मी शंकीत नाहीय की एखादा कुणी निराशाजनक व्हावा. कधीकधी सहजयोगी फार निराश होतात आणि अत्यंत निराशेने म्हणतात, सोडून द्या (हे सर्व). आई आम्ही यामुळे अगदी संपलेलो आहोत आणि आता अधिक काही नाही (उरलंय). परंतु मला माहित नाही की माझे चित्त आत्म्यापासुन कसे दूर करावे. जर तुम्ही प्रयत्न करु शकता, तर ते दूर करण्याचा खूप खूप प्रयत्न करावा. (परंतु) तुम्ही (तसं) करु शकत नाही. कारण तुम्हीच तेथे आहात. म्हणून ते काहीही असो, जेवढे अधिकाधिक शक्य आहेत, तेवढ्यांना वाचवण्यासाठी तुम्ही लढाल. म्हणून सर्व जे सहजयोगी अधूमधून वैफल्यग्रस्थ होतात, (त्याबद्दल) मला म्हणायचे आहे की तुम्ही वैफल्यग्रस्थ होता कामा नये. तुम्ही तुमचे धैर्य व समजूतदारपणा सांभाळायचा आहे.

जर तुम्हाला दुसऱ्यांबद्दल भावना असतील आणि जर तुम्ही त्यांचेबद्दल संबंध दाखवलात तर ते (लोक) समजून घेतील आणि तुम्ही अधिकाधिक लोक वाचवू शकाल. बंधनमुक्त करु शकाल. आणि ते परमेश्वराच्या राज्यात प्रवेश करु शकतील. जसे तुम्ही आनंदी आहात, तसे ते देखिल आनंदी होतील.

फक्त एक अडचण (अडथळा) आहे की तुम्हाला वाटेल की पुष्कळसे (लोक) अद्याप हरवून बसले आहेत. काही हरकत नाही, तुम्हाला फार परिश्रम करायचे आहेत.

तुम्ही समजून घ्यायचे आहे की काही दुष्ट शक्ति आहेत की त्या त्यांना खाली खेचित आहेत. ते अज्ञानी आहेत आणि त्यांना माहित नाही की या ऐहिक संघर्षापलिकडे एक जीवन आहे. सुंदरता आणि वैभव याचे शाश्वत जीवन ! परंतु मला खात्री आहे की हळूहळू ते घटीत होणार आहे. खास करून या सभेमध्येच ! त्यांना पुष्कळसे चढउतार आहेत व संपूर्ण रा.ष्ट्र नाऊमेद होऊन बसली आहे.

परंतु एखाद्याने अद्याप समजून घेतले पाहिजे की परमेश्वराचे कार्य हे परमेश्वराकडूनच आशिर्वादित होते. तो त्याचे सर्व आशिर्वाद तुम्हाला देईल म्हणजे तुम्ही तुमची इच्छित कर्तव्ये करू शकाल. वेळ पुढे जात आहे आणि आता फार थोडा वेळ उरला आहे. तोही (काळ) बाद होत आहे आणि म्हणूनच (सर्वत्र) वाढती निराशाजनक स्थिती आहे. या प्रत्यक्ष निराशेतूनच या पृथ्वीतलावर सहजयोगाच्या आगमनाने जन्म घेतला आहे.

जो तुमच्या आजूबाजूला आहे असा जो वाटतोय त्या अडथळ्या बरोबर लढण्यासाठी तुम्हाला अधिक शक्तिमान वाटले पाहिजे आणि या निर्मितीचे अंतीम ध्येय घटीत केले पाहिजे.

परमेश्वर तुम्हाला आशिर्वादीत करो.